प्रकरण दुसरे :

# सहकाराची तत्वे आणि विकास

## २.१ प्रस्तावना :

जगात सहकारी चळवळीचा उगम १८४४ साली **रॉशडेल पायोनिअर्स** पासून झाला. आपल्या देशात १९०४ च्या पहिल्या सहकारी कायद्याने झाला. तेंव्हापासून गेल्या दीडशे वर्षात सहकारी चळवळीपासून आतापर्यन्त सहकारी अर्थव्यवस्था बनली आहे. भांडवलशाही पासून साम्यवादी देशापर्यन्त सर्व राजकीय तत्वप्रणालींच्या देशात प्रसार झाला आहे. सहकारी अर्थ व्यवस्था आता सार्वकालीक व सार्वदर्शिक अर्थव्यवस्था बनली आहे.

भारतासारख्या कृषीप्रधान देशात सहकाराचे महत्व अत्यंत महत्वाचे असल्याने गेल्या सत्तर - ऐंशी वर्षात अनेक मान्यवर नेते व अधिकृत मंडळांनी सहकार चळवळ विकसीत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आज देश एका गंभीर संक्रमणावस्थेतून जात आहे. सध्या दिसत असलेल्या राजकीय अस्थिरतेच्या व अनिश्चततेच्या मुळाशी जसे राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान देणारे प्रश्न आहेत, तसेच मुलभूत आर्थिक प्रश्न आहेत. भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे कष्ट-करी जनतेचे कांही विशिष्ट प्रश्न आहेत. ग्रामीण अर्थ व्यवस्थेत अत्यंत शोषीत, मागासलेला आणि दुर्लक्षित असा वर्ग आहे. ग्रामीण भागातील शेतक-यांचे आर्थिक प्रश्न सोडविल्याशिवाय ग्रामीण भागाची ख-या अर्थाने टिकावू स्वरुपाची प्रगती साध्य होणार नाही.

सहकारी पत पेढ्यांमुळे "" उत्तम शेती, उत्तम व्यापार, उत्तम जीवनमान "" शक्य व्हावे अशी अपेक्षा आहे. मागासलेल्या देशांना तर ही संस्था अतिशय सोयीस्कर समजली जाते. भारतात सहकारावर भर देण्यामागील हेतू हाच आहे. गरीब शक्तीहीन लोकांना आपआपली सीमीत सांपत्तीक साधने एकत्रीत करुन अधिक सामर्थ्यशील बनता यावे व उत्पन्नवाढून जीवनमान वाढविता यावे हा हेतू आहे. कर्जाच्या खाईतून व पिळवणूकीतून त्यांची सुटका करणारी व विकासाचा मार्ग त्यांचा त्यांना स्वच्छ दाखवणारी सामुदायीक संस्था म्हणजे सहकारी पतपेढ्या होय.

## २.२ सहकाराच्या काही व्याख्या :

**सी. आर्. फे :** दुर्बलांनी निर्मिलेली, निस्वार्थी भूमीकेतून संयुक्त व्यवहारासाठी त्यांनी चालविलेली ही सहकारी संस्था असते. ज्या प्रमाणात सभासद व्यवहार करतात त्या प्रमाणात त्यांना संस्थेतील लाभात सहभाग उपलब्ध होतो.

**सर होरेस प्लंकेट :** अधिक चांगली शेती, अधिक चांगला व्यापार, आणि अधिक चांगले जीवनमान यासाठी स्वावलंबनाने संघटीत केलेली संस्था ही सहकारी संस्था होय.

**प्रोफेसर कॅसमन :** सहकार म्हणजे सामाजिक आशय असलेली आर्थिक पध्दती आहे. या व्यवस्थेमध्ये व्यवहार व नीती याची सांधेजोड घालण्याचा प्रयत्न केला आहे.

**कौटील्याचे अर्थशास्त्र :** जो कोणी सहकारी व्यवस्थेबाहेर राहतो तो आपले सेवक कामासाठी पाठविलेल्या खचात त्याचा वाटा राहिल. परंतू लाभात मात्र त्याचा वाटा राहणार नाही.

**आंतरराष्ट्रीय संघटनेच्यामते** "सामान्यत: मर्यादित साधने असलेल्या व्यक्तींनी स्वेच्छापूर्वक एकत्र येवून आपली समान उद्दिष्टे साध्य

करण्याच्या हेतूने लोकशाही तत्त्वप्रणालीनुसार व्यवसाय संघटनेचे नियमन करणारी जी संस्था स्थापन केलेली असते तिला सहकारी संस्था म्हटले जाते "

**१९१५ च्या मॅक्लॅगन समितीच्या अहवालानुसार :**

" सहकारी तत्वज्ञान असे प्रतिपादन करते की, एकाकी दुर्बल व्यक्तींना इतरांशी सहकार्य करुन परस्पर साहाय्याच्या अथवा नैतिक विकासाआधारे सधन किंवा सबलांना उपलब्ध असलेले भौतीक लाभ पदरात पाडून घेता येऊ शकतात, आणि तिच्या नैसर्गिक क्षमतेचा सहज विकास साधता येतो.

## २.३ सहकाराचा उगम :

सहकारी चळवळीचा उगम, सुरवात औधोगिक क्रांतीनंतर झाली असे मानण्यात येते. औधोगिक क्रांतीनंतर निर्माण झालेला भांडवलदार वर्ग आणि मजुर वर्ग या दोन वर्गाच्या हितसंबंधामध्ये वितुष्ट निर्माण झाले, आणि त्यातून सहकारी चळवळीचा जन्म झाला. इंग्लंडमध्ये १८४४ मध्ये विणकरांनी स्थापन केलेली " रॉशडेल इक्वीटेबल पायोनियर्स सोसायटी " ही पहिली संस्था मानली जाते.

**रचना –**

सहकारी चळवळीची रचना रॉशडेल पध्दती, जर्मनीतील रफायझन पध्दती, शुल्झे डेलिश पध्दतीवरुन निर्माण केलेली आहे. उपभोक्ता, शेतकरी लहान कारागीर, व्यापारी यांच्या संदर्भात ह्या तीन पध्दतीची कल्पना आणि आखणी करण्यात आलेली असल्यामुळे त्यांच्या सहकारी संघटनात, व्यवहार पध्दतीत आणि नजिकच्या उद्दिष्टात भिन्नता राहणार हे सहज

समजून येईल. " **सहकारांतर्गत सहकार** " हे १९६६ मध्ये अंर्तभूत करण्यात आलेले सहकाराचे जगमान्य मुलभूत तत्व आहे.

## २.४ सहकार विश्वव्यापी चळवळ [ व्याप्ती ] :

ब्रिटनमध्ये सर्वप्रथम प्रकाशमान झालेली चळवळ आज विश्वभर आपली प्रकाशकिरणे उधळत असलेली दिसून येते. डॉ. फॉकेट यांच्या मते " भौगोलिकदृष्ट्या सहकाराचा जेवढा विस्तार झालेला आहे तेवढा इतर कोणत्याही व्यवसाय संघटनेचा झालेला नाही " १९३७ पासून सहकारी चळवळीचा सर्वांगाने विकास होवून तिला बहार आला. आज जगातील बहुसंख्य राष्ट्रात सहकार या स्वेच्छा संघटनेचे अधिक महत्वाचे स्थान टिकून आहे. काही राष्ट्रात तर व्यवसाय संघटनाचे सहकार हे प्रधान तत्व असून कृषी विपनन, पतपुरवठा, उपभोग्य वस्तू वितरण इ. महत्वाची कामगिरी बजावत आहे.

आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिक विकासाच्या संदर्भात शासनांनी सहकाराच्या आवश्यकतेची नोंद घेतलेली आहे. सहकारी संस्थांनी कृषी समस्या सोडविण्यास प्राधान्य देऊन ग्रामीण आर्थिक विकास वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

## २.५ सहकाराची मुलतत्त्वे :

सहकाराच्या व्याख्येबद्दल एकमत नाही. कोणी सहकाराच्या एका पैलूवर भर देतो, तर कोणी दुस-यावर. म्हणून व्याख्येच्या तपशील-मध्ये न जाता सहकाराची मुलतत्त्वे कोणती याचा विचार करणे अधिक उपयुक्त होईल.

रॉशडेल पायोनियर्सनी मान्य केलेले तत्व आजही सर्वमान्य झालेली आहे. या तत्वप्रणालीवर विचार करण्यासाठी इंटरनॅशनल

को - ऑपरेटिव्हज् अलायन्स या संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेत मांडलेले विचार हे व्यावहारिक व वस्तूनिष्ठ असल्या कारणाने सर्व देशाना मान्य होवू शकले. या तत्वप्रणालीचे थोडक्यात विवेचन पुढीलप्रमाणे -

**[१] खुले सभासदत्व :**

याला दोन अंगे आहेत. एक म्हणजे धर्म, जात, पंथ, भाषा इत्यादी गोष्टीचा विचार न करता कोणत्याही व्यक्तीला सहकारी संस्थेचे सभासद होता येते. दुसरे म्हणजे एखाद्या व्यक्तीला सभासद होण्याबद्दलचे पुर्ण स्वातंत्र्य असते. इच्छेविरुध्द त्यांना संस्थेत येण्याची सक्ती न करण्याचे तत्व असले तरी विशिष्ट परिस्थितीत सक्ती ग्राह्य मानली जाते. थोडक्यात " खुला प्रवेश " या प्राथमिक सहकारी तत्वाबद्दल सांगावयाचे तर असे सांगता येईल की, सहकारी संस्थेचे विशिष्ठ हेतू मान्य असणा-या सभासदांना त्या सहकारी संस्थेत मुक्त प्रवेश असतो.

**[२] लोकशाही नियंत्रण :**

सहकारी संस्थेचे व्यवस्थापन आणि नियंत्रण हे संपूर्ण लोकशाही पध्दतीने केली जाते. सहकारी संस्थेमध्ये भाग घेणा-या प्रत्येक व्यक्तीला समान दर्जा दिला जातो. सहकार भांडवलाची संघटना नसल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला एकच मत असते त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला सहकारी संस्थाही आपली मक्तेदारी आहे असे मानता येत नाही. लोकशाही विचार व तत्वप्रणालीने सहकारी संस्थेचे कार्य चालते तोपर्यंतच संस्थेचे व्यवस्थापन सभासदाच्या हिताच्या दृष्टीने चालत असते.

**[३] भांडवलावर मर्यादीत व्याज :**

सहकारी संस्थेमध्ये सभासद जो पैसा गुंतवितात तो त्या पैशावर व्याज मिळविण्याच्या हेतूने गुंतवित नाही तर, व्यवहार चालविण्याच्या

दृष्टीने आवश्यकता म्हणून भांडवल गोळा व्हावे म्हणून तो हा पैसा गुंतवितात, साहजिकच संस्थेचे आर्थिक स्थैर्य आणि त्यासाठी आवश्यक पैशाची गरज या गोष्टींना आधिक प्राधान्य मिळते.

**[४] नफ्याचे वाटप :**

रॉशडेल येथील १८४४ मध्ये स्थापन केलेल्या ग्राहक भांडारातील नियमातही हे तत्त्व अंतर्भुत होते. सहकारी संस्थेचा वाढावा सभासदात त्यांनी घेतलेल्या भागभांडवलाच्या प्रमाणात विभागून दिला जात नाही तर त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात विभागला जातो. "चार्लस जिंद"च्यामते हे तत्त्व एका अर्थाने क्रांतीकारक म्हणता येईल. प्रो. एच. एल. काझी यांच्या मते",वाढाव्याचे वितरण करणारी सहकारातील पध्दत ही भांडवलशाही आणि सरकारी भांडवलशाही पेक्षा वरिष्ठ दर्जाची आहे." १९६६ च्या कर्वे समीतीने असे ठरविले आहे की, शक्यतो सहकारी संस्थेने सभासदांशीच व्यवहार करावा आणि मालाची किंमत बाजारभावापेक्षा थोडासा तरी कमी असावा. " ना नफा ना तोटा " यापेक्षाही किंमत थोडीशी जास्त असेल आणि जो नफा येईल तो व्यवहाराच्या प्रमाणात सभासदांना वाटून द्यावा.

**[५] सभासद शिक्षण :**

सहकारी संस्थानी सदस्याच्या ज्ञानात भर घालण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. या तत्वाची व्याप्ती ही विस्तृत आहे. शिक्षणाबाबतची व्यवस्था सहकारी संस्थेचे उद्दिष्टे, व्यवस्थापन आणि दैनंदिन व्यवहाराशी पुरक असावी लागते. सहकाराचा अर्थ खोलवर रुजण्यासाठी आधिक खर्चाची व्यवस्था करावी अशी अपेक्षा असते.

१९५३ मध्ये रॉशडेल ग्राहक सहकारी भांडाराच्या सदस्यांनी व्यवहारातील वाढाव्याचा २.५% भाग खास सदस्य शिक्षणासाठी खर्च केला

जात होता. जागरुक सदस्यासाठी सहकार शिक्षण आवश्यक आहे. मॅडीसन च्या मते,"सहकारी संस्थांचा कारभार सहकारी शिक्षण घेतलेल्या व्यक्तीकडे न देता दुस-या व्यक्तीकडे दिला गेला असेल तर तो हास्यास्पद ठरेल." या विषयाला हवा तेवढा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे सुजाण सदस्य वर्ग निर्माण करु शकत नाही. त्यामुळे सहकारी व्यवहारात अनेक दोष निर्माण होतात आणि सहकार हा अपयशी ठरतो.

**[६] सहकारांतर्गत सहकार :**

सहकारांतर्गत सहकार हे तत्व १९६६ च्या समीतीने नव्याने अंतर्भूत केले असून बदललेल्या आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीच्या संदर्भात ते अतिशय महत्वाचे मांडलेले आहे. हे एक व्यक्ती विकासाचे तत्व आहे. आर्थिक आणि व्यवहारीक क्षेत्राकडे दृष्टीक्षेप टाकला हे स्पष्ट दिसून येते की, त्यांचा कल आकार आणि प्रकार वाढविण्याकरिता आहे. परंतू सहकारात व्यक्ती विकास वाढविण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे त्यावर निश्चितपणे मर्यादा पडतात. सहकारी संस्थानी सदस्याच्या हिताचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी व्यवहारात परस्पराशी सहकार्य करणे हे लाभ - दायक ठरणार आहे. सहकारांतर्गत सहकार हे केवळ नैतिक तत्व नसून परस्पर प्रगतीचे तत्व आहे. थोडक्यात आर्थिक व व्यापारी जगतात संस्थांचा आकार वाढविण्याकडे कल आढळतो.

**[७] रोखीचे व्यवहार :**

विकसनशील अर्थव्यवस्थेत सावकार, सराफी पेढी व व्यापारी यांचेच प्राबल्य असते, आणि त्यांचे व्याजाचे दर हे नेहमी जाचक असतात अशा परिस्थितीत बचत व रोखीचे व्यवहारावर भर देणे अधिक उपयुक्त ठरते. रोखीच्या व्यवहारात वाढ करुन दुर्बल घटकांच्या सहकारी संस्था अधिक सहजतेने आणि सुलभरित्या सदस्यांची वाढती गरज भागविण्याची प्रयत्न करु शकते. हे व्यवहार लहान आर्थिक गटातील लोकांना आधिक

स्वस्त ठरतात.

**[८] राजकीय व धार्मिक तटस्थता :**

रॉशडेल प्रवर्तकांच्या मते सभासदामध्ये राजकीय किंवा धार्मिक कारणामुळे भेदभाव केला जावू नये. सभासदाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सहकारी संस्थेची स्थापना करण्यात आल्यामुळे राजकीय व धार्मिक बाबींचा दबाव या बाबीवर ठेवता येत नाही. परंतू चालू परिस्थितीमध्ये या तत्वाचा त्याग करण्यात आलेला आहे. ज्या खेड्यामध्ये ज्या धर्माची, पंथाच्या लोकसंख्येचे प्रमाण आधिक त्या धर्माच्या लोकांची मक्तेदारी निर्माण झालेली आहे. तसेच राजकीय प्रभाव त्याच प्रमाणात असलेली दिसून येते. बदलत्या परिस्थितीनुसार या तत्वाचा त्याग करण्यात आला असला तरी या तत्वाचा सर्वत्र आजही आदर केला जातो. डॉ. ए.एफ.लेडलॉ या तत्वाचा उल्लख " " असे करतात.

२.६ **भारतातील सहकार चळवळीची विकासात्मक प्रगती :**

**ग्रामीण समाजाचा आधार सहकार –**

भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये शेती आणि सहकार चळवळ यांचा अन्यन साधारण संबध आहे. ८४ कोटी लोकसंख्या असलेल्या या शेतीप्रधान देशामध्ये अजूनही ७०% लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ६ कोटी २७ लाख होती. त्यापैकी ६५ लाख शेतमजूर होते, तथापि एकूण वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाशी शेती उत्पन्नाचे प्रमाण हे फक्त २६% पडते.

भारतात सहकार चळवळ सुरू होऊन आज ९० वर्षे पुर्ण झाली तेंव्हापासून आजपर्यंत सहकार क्षेत्रात एकसारखी प्रगती होत आली आहे. परंतु भारतातील सहकारी चळवळीचा तुलनात्मक अभ्यास केला तर दोन विभागामध्ये करावा लागेल. स्वातंत्र्यपुर्वकालातील व स्वातंत्र्योत्तर कालातील सहकार चळवळ.

स्वातंत्र्यपुर्वकाळातील सहकारी चळवळीचा अभ्यास करीत असताना जरी सहकारी संघटनेचा उगम युरोपीय देशामध्ये झाला असला तरी भारताच्या दृष्टीने ते नवीन नव्हते. कारण मनूने घालून दिलेल्या नियमात व कौटिल्याच्या अर्थशास्त्रात त्याची बीजे आढळतात. सम्राट अशोकानीही दिलेल्या आदेशात ती नमूद करण्यात आलेली आहे. भारतातील निधी, चिटफंड यासारख्या संघटनाची आधारतत्वे भारतातील सहकाराचीच कास धरतात, परंतु भारतामध्ये आधुनिक सहकारी संघटनेची स्फूर्ती जर्मनीकडून घेतलेली आहे. जर्मनीतील दरिद्री शेतक-यांनी निर्माण केलेली रफायफाझन संस्थेनी भारतीय ग्रामीण दरिद्री शेतक-यांना आशेचा किरण दर्शविला. १८८२ मध्ये विल्यम वेडबर्न व न्यायमुर्ती माधवराव रानडे यांनी सरकारला ग्रामीण क्षेत्रासाठी सहकारी पतपेढयाची शिफारस केली होती. या शिफारशीनुसार १८९४ मध्ये म्हैसूर सरकारने शेती बँका, सहकारी तत्वावर संघटीत करण्यात आली, आणि १९०४ चा पहिल्या सहकारी कायद्याची पार्श्वभूमी निर्माण झाली.

**१९०४ चा कायदा :-**

१९०४ चा सहकारी कायदा हा इंग्लंडच्या फ्रेंडली सोसायटीज् कायद्याच्या धर्तीवर बनविण्यात आला. या कायद्यानुसार सभासदामध्ये "सहकार बचत, स्वावलंबन " या त्रीस्तरीय सुत्रास उत्तेजन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. नोंदणी करीत असताना किमान सहा व्यक्ती जर एकत्र आले तर ती संस्था नोंदली जात होती. सहकारी संस्थेचे ग्रामीण व

शहरी असे वर्गिकरण करण्यात आलेले होते.

या कायद्याने सुरवातीस दाखवलेली प्रगती ही उल्लेखनीय होती. १९०६ मध्ये संस्थाची संख्या ८४३ होती. तर सभासदांची संख्या ९०.८ हजार होती, आणि खेळते भांडवल २३.७० लक्ष होते. या सहकारी कायद्या - नुसार केवळ पतपुरवठा करणाऱ्या संस्था निर्माण झाल्यामुळे सहकारी चळवळ ही एकांगी झालेली होती. तसेच ग्रामीण व शहरी अशा स्वरूपाचे वर्गीकरण हे शास्त्रशुध्द नव्हते. त्यामुळे १९११-१२ मध्ये नविन पुर्नघटीत कायदा पास केला.

**१९१२ चा कायदा :-**

या कायद्याने जुन्या कायद्याची व्याप्ती वाढविण्यात आली. हा कायदा सर्व बाजूने विचार करून काळजीपुर्वक व दुरदृष्टी ठेवून करण्यात आले. यामध्ये मर्यादीत व अमर्यादीत असे नवे वर्गीकरण कायद्यात घालण्यात आहे. नफ्याच्या २५% रक्कम हे राखीव निधीकडे वळविल्यानंतर लाभांश वाटपाची परवानगी देण्यात आली.

**मॅक्लॅगन समिती :-**

१९१४ मध्ये सर एडवर्ड मॅक्लॅगन याच्या नेतृत्वाखाली सात सभा-सदांची एक समिती नेमण्यात आली. या समितीने पुढीलप्रमाणे सहकाराचे वर्गीकरण केले.

१] व्यक्तीने बनलेली प्राथमिक संस्था

२] देखरेखीसाठी संस्थांची बनलेली युनियन

३] बॅंकीग व्यवसाय करणारी सहकारी संस्थेची संघसंस्था

म्हणजेच थोडक्यात प्राथमिक संस्था ही प्रत्येक खेड्यात एक तर प्राथमिक सहकारी संस्थेच्या देखरेखीसाठी निर्माण झालेली युनियन, आणि प्रत्येक प्रांताकरीता किंवा राज्याकरिता निर्माण करण्यात आलेली संघ - संस्था होय.

**प्रा. गाडगीळ समिती :-**

१९३० च्या जागतिक महामंदीनंतर मेहता - भन्साळी अहवाला-नुसार 'बॉम्बे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट' झाला. त्यामुळे शेतक-यांना कर्जमाफी तसेच हप्ताबंदीची सवलत मिळाली.

या महामंदिच्या कडू अनुभवातून १९४४ मध्ये प्रा. धनंजयराव गाडगीळ यांची समिती नेमण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार अल्पमुदत व दिर्घमुदत कर्जपुरवठा, पीक कर्ज योजना, इत्यादीची योजना मांडली पुढे गोरवाला समीतीने ही योजना मान्य केली.

१९०४ ते १९२९ या काळातील सहकारी संस्थांची प्रगती पुढील कोष्टकाने दाखवता येईल.

**कोष्टक क्र. २.१**

| वर्षे | सह. संस्थेची संख्या | सभासद [हजार] | खेळते भांडवल [लक्ष] |
|---|---|---|---|
| १९०६ - ०७ | ८४३ | 9054 | २३.७२ |
| १९१७ - १८ | २५,१९२ | 10,900 | ७६०.०९ |
| १९२४ - २५ | ६३,८७३ | 20,025 | १९.६१ |
| १९२८ - २९ | ८७,९९१ | 30,008 | ३२.३८ |

१९२९ ते १९४७ या कालातील सहकारी संस्थेची प्रगती पुढीलप्रमाणे -

कोष्टक क्र. २.२

| वर्षे | सह. संस्थांची संख्या [हजार] | सभासद [हजार] | खेळते भांडवल [लक्ष] |
|---|---|---|---|
| १९२९ | ८७.९९१ | ३.००४ | ३२.३८ |
| १९३९ | ११६.०९ | ६०.०० | १०४.६० |
| १९४६ | १७२.०० | ९१.६० | १६४.०० |
| १९४७ | १३९.०० | ९१.०० | १५६.०० |

अशी ही भारताची सहकारी चळवळ स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळापर्यंत मार्गक्रमन करीत आली. वाढत्या प्रमाणात तिच्यात विविधता येत होती. तरी एकुण अर्थरचनेत सहकारी व्यवहाराचे प्रमाण नाममात्र होते, अशी टिका करण्यात येत होती.

## २.७ स्वातंत्र्योत्तर काळातील सहकारी चळवळीचे मार्गक्रमण :-

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला आणि जनतेच्या आकांक्षांना प्रतिसाद देणाऱ्या विकासाच्या योजना आखण्यास प्रारंभ झाला.

भारतीय घटनेत राज्याच्या धोरणासंबंधी मुलभुत तत्त्वे नमूद करण्यात आलेली आहेत. उदा. [१] प्रत्येक नागरीकाला वाजवी प्रमाणात जिवनावश्यक साधनाबाबतचा अधिकार मान्य करण्यात आला.

[२] सर्वसाधारणकल्याणासाठी राष्ट्रीय संपत्तीचे वितरण करणे.

[३] संपत्तीचे केंद्रीकरण टाळणे.

या मार्गदर्शक तत्वानुसार ग्रामीण आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी १९५१ पासून नियोजनाचे माध्यम वापरण्यात येवू लागले.

२.७.१ अखिल भारतीय ग्रामीण पत पुरवठा पहाणी समिती :

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने १९५१ साली ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा व पहाणी समीतीची' स्थापना करण्यात आली. १९५४ मध्ये या समीतीने आपला अहवाल सादर केला. समीतीचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१] शेतक-यांना मिळणा-या कर्जामध्ये सावकाराचा वाटा अधिक होता, तर सरकारी संस्थांचा वाटा फक्त ३.५ टक्के एवढाच होता.

२] सहकारी संस्थांनी केलेल्या पत पुरवठ्यामध्ये सधन शेतक-यांचा वाटा अधिक होता.

३] सहकार चळवळ ही काही प्रमुख राज्यापर्यन्त पोहोचली होती.

सहकारी पत पुरवठा संस्थांचे अपयश प्रामुख्याने संस्थांच्या आकारातील उणीवा, अकार्यक्षमता, कार्यातील दोष यामध्ये एकवटलेले होते. यामुळे गोरवाला समीतीने आपल्या शिफारसीमध्ये असे स्पष्ट केले कीं सहकारी पत पुरवठ्याची पुर्नरचना करुन दुर्बलांना मदत करण्याची रचना केली पाहिजे. या समीतीची सुचना पुढील प्रमाणे :

१. ग्रामीण सहकारी संस्था आर्थिदृष्ट्या सुदृढ करणे. त्याकरिता सहकारी संस्थांची पुर्नरचना करणे.

२. पीक कर्ज योजनेचा अवलंब करणे. त्यामुळे अल्पमुदतीचे कर्ज पीकाच्या तारणावर दिले जावे.

३. सभासदांनी आपल्या मालाची विक्री सहकारी संस्थांमार्फतच करावी. त्यामुळे सहकारी संस्था व सभासद या दोहोंचाही फायदा होवू शकतो.

४. सहकारी संस्थांनी मालाच्या साठवणुकीसाठी गुदाम व्यवस्था राबवणे त्यासाठी सहकारी विकास आणि गुदाम महामंडळाची स्थापना करावी.

५. सहकारी संस्थांना ग्रामीण जनतेच्या गरजांची पूर्तता करता यावी या हेतूने दीर्घ मुदत निधी रिझर्व्ह बँकेमध्ये निर्माण करावा.

६. इंपिरियल बँकेचे राष्ट्रीयकरण करून सहकारी विक्री आणि प्रक्रिया संस्थांना आवश्यक तेथे कर्जपुरवठा करण्याची व्यवस्था करावी.

७. योग्य प्रकारचे प्रशिक्षित वर्ग करण्यासाठी राज्यपातळीवर मध्यवर्ती प्रशिक्षण समीतीची स्थापना करावी.

२.७.२ वैकुंठभाई मेहता अहवाल – १९५९ :

१९५९ मध्ये वैकुंठभाई मेहतांच्या अध्यक्षतेखाली सहकारी पत पुरवठ्याचा विचार करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीची शिफारस पुढीलप्रमाणे :

१. एका खेड्यापुरती सोसायटी अर्थक्षम होत असतील तर दोन तीन मैलांच्या परिसरातील खेडी एकत्र आणून संस्था स्थापन करावी.

२. सभासदांनी पुरेसे भांगभांडवल संस्थेस देण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

३. सहकारी संस्थांनी आपले अंतर्गत निधी वाढविण्याचे प्रयत्न करावेत.

४. कर्जदारांची परतफेडीची पात्रता पाहून कर्ज मर्यादा ठरविण्यात यावी.

५ . रिझर्व्ह बँकेने मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कर्जमर्यादा अधिक सोप्या कराव्यात.

६. सरकारी तगाई कर्जे सहकारी पत रचनेमार्फत द्यावी.

## २.७.३ मिर्धा समितीचा अहवाल [ १९६४] :

भारत सरकारने १९६४ मध्ये श्री. मिर्धा यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी संस्थांच्या निर्दोष, निकोप व्यवस्थापनास मार्गदर्शक अशी तत्वे निर्धारित करण्यासाठी एक समिती नेमली. १९६४ मध्ये सादर केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे:

१. सावकारांना सहकारी पतपुरवठा संस्थेमध्ये प्रवेश देवू नये.

२. शेतमालाची खरेदी विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांना प्राथमिक दर्जाचे सभासदत्व देवूनये.

## २.७.४ अखिलभारतीय ग्रामीण पतपुरवठा पुन:पहाणी समिती :

रिझर्व्ह बँकेचे सेवानिवृत्त गव्हर्नर वेंकटय्या यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमण्यात आली. यांच्या अहवालात महत्वाच्या व मूलगामी शिफारसी पुढीलप्रमाणे.

१. आर्.बी.आय. मध्ये कृषी पत मंडळाची स्थापना करावी.

२. व्यापारी बँकांकडे शेती पतपुरवठा संबंधात जबाबदारी सोपविण्यात यावी.

३. काही ग्रामीण सहकारी संस्था अर्थक्षम नसल्याचे या समितीला आढळून आल्याने १९७१ पर्यन्त अर्थक्षम संस्थाच अस्तित्वात राहतील अशा पध्दतीने पुर्नरचना करावी.

४. थकबाकीवर कडक नियंत्रण करावे आणि कर्जाच्या वापरावर प्रभावी देखरेख करता यावी अशा सूचना दिल्या. त्यासाठी कर्ज पुरवठा अधिक लवचिक बनविण्याची पध्दत अवलंबवावी.

५. कॅश -क्रेडिट पध्दतीचा वापर करावा.

६. शेती भांडवली स्वरूपाची उत्पादकता वाढविण्याच्या योजनेवर भर देण्याची गरज प्रतिपादली आहे.

७. ग्रामीण विद्युत महामंडळाची योजना अमेरिका देशाच्या धर्तीवर करण्यात यावी.

८. सहकारी संस्थांची कार्यक्षमता वाढविणे व प्रशिक्षित अनुभवी सेवकवर्ग चांगल्या वेतनावर आकृष्ट करणे शक्य व्हावे म्हणून " केडर " पध्दतीचा सहकारी संरचनेत अवलंब करावा.

## २.८ भारतातील सहकारी चळवळीची रचना :

जगातील अनेक देशांमध्ये शेतीला पतपुरवठा व्हावा या उद्देशाने अनेक संस्था सहकारी तत्वावर निर्माण झालेल्या आहेत. शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थांमध्ये सहकारी संस्थांना अग्रक्रम दिला जातो. शेतकऱ्यांना योग्य व पुरेसा अर्थपुरवठा व्हावा म्हणून १९२७ मध्ये जिनेव्हा येथे भरलेल्या जागतीक अर्थ परिषदेने सहकारी संस्थेचे वित्त पुरवठ्यातील स्थान स्पष्टपणे नोंदविले आहे. शेती उत्पादनातील वाढ ही शेती वित्त पुरवठ्याशी संबंधीत असते. त्यामुळे राष्ट्रामध्ये सहकारी वित्त पुरवठा व्यवस्था नसेल तर त्या स्थापन कराव्यात, त्या संस्था प्रभावी बनाव्यात असा विचार मांडला गेला.

श्री. एफ. ए. निकोलसन यांच्यामते "शेतकऱ्यांच्या विविध वित्तीय गरजा समर्थपणे सोडवू शकणारी यंत्रणा म्हणून सहकारी संस्था ग्रामीण जीवनात भरीव कामगिरी करतात." सहकारी संस्था वित्तपुरवठ्याची मूलभूत समस्या प्रभावीपणे सोडवतात. संस्थांना सभासदाच्या कर्जाच्या गरजेची तीव्रता आणि कुवत याचे अवलोकन करण्याची संधी प्राप्त झालेली असते.

२.८.१ सहकारी पत पुरवठ्याची प्रमुख उद्दिष्टे :

प्रा. होरेस बेलझा यांच्यामते :

१. निधी उभारण्यासाठी बचतीचे संवर्धन.


२. कर्जाचा उपयोग उत्पादीत कारणा करिता होण्यासाठी देखरेख व मार्गदर्शन करणे.

३. व्यवस्थापकीय खर्च कमी करून व्याजाचा दर स्वस्त ठेवण्याचा प्रयत्न करणे.

४. अंतर्गत मार्गाने भांडवल वाढ करण्याचा प्रयत्न करणे.

ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेती प्रधान अर्थव्यवस्था असल्याकारणाने शेतक-यांना द्यावा लागणारा पतपुरवठा हा अल्पमुदतीचा, मध्यम व दिर्घ - मुदतीचा असावा. या उद्देशाने भारतात सहकारी बँकाची त्रिस्तरिय रचनेचा अवलंब केला

भारतातील सहकारी पतपुरवठ्याची रचना



प्रा. गाडगीळ यांच्या मते सहकारी बँकिंगच्या रचनेमुळे शेतकरी, कारागीर आणि दुर्बल घटकांना पतपुरवठा करणे शक्य झालेले आहे. या रचनेमुळे सांपत्तीक साधनाचे एकत्रीकरण व संपत्तीचे वितरण सोयीस्करपणे साधता येऊ शकते.

२.८.२ प्राथमिक सेवा सहकारी संस्था :

ग्रामीण भागातील प्राथमिक सेवा सहकारी समिती या सर्व सहकारी पतसंस्थेच्या पाया आहेत. भारतात सहकारी चळवळ प्राथमिक पेढ्यांच्या स्थापनेने १९०४ मध्ये अधिकृतपणे सुरू झाली. या सह. पतसंस्थांची मर्यादा खेड्यापुरती मर्यादीत असल्यामुळे खेड्यातील शेती - विकास वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येवू लागला. " अधिक चांगली शेती, अधिक चांगला व्यवसाय आणि अधिक चांगले जीवनमान " हे ग्रामीण सह. संस्थेचे उद्दिष्ट असल्यामुळे प्राथमिक सेवा सहकारी संस्थांना कार्य वाढविण्यास मदत होवू लागले.

ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी एकांगी अर्थपुरवठयाचा मार्ग अवलंबने योग्य होणार नाही. यासाठी ग्रामीण शेतकरी माणूस बदलण्याकरिता विविध कार्यकारी सहकारी संस्थांची शिफारस करण्यात आली.

या शिफारशीनुसार पीक उत्पादन, पीक विक्री, खत - बियाणांचा पुरवठा, दुग्ध व्यवसाय, जीवनावश्यक गरज भागविणा-या वस्तूंचीही उपलब्धता व्हावी अशा प्रकारची सुचना केली.

१९६३ च्या सहकारी पतपुरवठा समितीने सुचविलेल्या सहकारी पतपुरवठ्याचे कार्य.

१] संस्थेने उत्पादन कार्यक्रमाशी धनिष्ठ संबंध ठेवावा.

२] सभासदांच्या कर्ज परतफेडीची कुवत विचारात घेवून कर्जपुरवठा करावा.

३] सभासदांच्या गरजेची पुर्तता करण्यासाठी मध्यवर्ती सहकारी बँका-कडून कर्जे घ्यावी.

४] सभासदाना खते, जंतूनाशके, औषध, बी-बियाणे, शेती अवजारे या वस्तूंचा पुरवठा करणे.

५] दैनंदिन गरजांच्या वस्तू पुरविणे. उदा. रॉकेल, धान्य इत्यादी

६] गुदाम गृहाची स्थापना करणे.

७] स्वत:च्या जबाबदारीवर शेतमालाची खरेदी विक्री करणे.

**कोष्टक क्र. २.३**

भारतातील प्राथमिक सहकारी संस्थेची संख्येची आकडेवारी [हजारामध्ये]

| राज्य | १९६०-६१ | शेकडा प्रमाण | सन १९८०-८१ | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | २६७१९ | ८.०४ | ३२२४४ | ११.७३ |
| आसाम | ८९०७ | २.६८ | ७३५७ | २.२५ |
| बिहार | २९३३९ | ८.८३ | १८६०० | ५.७० |
| गुजरात | १३९५९ | ४.२० | ३२३३३ | ९.९२ |
| जम्मू व काश्मीर | २१९२ | ०.६६ | १७२८ | ०.५३ |
| केरळ | ७०७२ | २.१२ | ९३६८ | २.८७ |
| म. प्रदेश | २५८५७ | ७.७८ | १२२५१ | ३.७५ |
| महाराष्ट्र | ३१५६४ | ९.५० | ६०७१५ | १८.६२ |
| पंजाब | ३२१५९ | ९.६८ | १५५१४ | ४.७४ |
| उत्तरप्रदेश | ६९०८७ | २०.८० | २७०४९ | ४.२९ |

भारतातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थातील सभासदाच्या संख्येची आकडेवारी

**कोष्टक क्र. २.४**

| राज्य | १९७९ – ८० सभासदांची संख्या | शेकडा प्रमाण | १९९०–९१ सभासदांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ९७८३ | १५.६१ | ८२६२ | १३.४३ |
| आंध्र | ७९७२ | १२.७२ | ९८४१ | १५.६२ |
| पं. बंगाल | ४०८२ | ६.५१ | ३२८५ | ५.२१ |
| उ. प्रदेश | ९०८४ | १४.४९ | १३७३३ | २१.८० |
| गुजरात | ४०३५ | ६.४३ | २०२३ | ३.२१ |
| कर्नाटक | ५६४० | ९.०० | ६१०२ | ९.६९ |
| बिहार | ४९४० | ७.८८ | ६२५४ | ९.९३ |
| तामिळनाडू | ८९८७ | १४.३४ | ७८१० | १२.४० |
| मध्य प्रदेश | ४५९३ | ७.३२ | ५६६१ | ८.९८ |
| राजस्थान | ३५४८ | ५.६६ | – | – |
| | ६५६६४ | १००. | ६२९७१ | १००. |

२.८.३ जिल्हा सहकारी बँक :-

प्राथमिक सेवा सहकारी समित्याची जिल्हापातळीवरील ही संघ संस्था आहे. तिला जिल्हा मध्यवर्ती सह. बँक असे म्हणतात. जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या प्राथमिक सह. संस्था या संस्थेचे सभासद असतात. जिल्ह्यातील विकास घडवून आणणेसाठी नेतृत्व करणारी

व तुलनेने आधिक सबल व संघटित असणारी संस्था असते. प्राथमिक पेढ्यांना व सेवा संस्थांना जिल्हा मध्यवर्ती बँक पतपुरवठा करते. प्राथमिक पतपुरवठा ह्या आर्थिकदृष्ट्या प्रबळ नसल्यामुळे मध्यवर्ती बँकेला महत्वाचा वाटा उचलावा लागतो. त्याचप्रमाणे त्यावर देखरेख ठेवण्याचे कार्यही करावे लागते.

जिल्हा मध्यवर्ती बँकेची आर्थिक साधने म्हणजे [१] भागभांडवल [२] राखीव निधी [३] सभासदाच्या ठेवी गोळा करणे [४] राज्य सहकारी बँक व सरकारकडून अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज [५] सरकारी देणग्या.

एकंदरीत मध्यवर्ती बँकेचे आज दिसणारे चित्र हे संमिश्र स्वरूपाचे आहे. सुरवातीस मध्यवर्ती बँकेची प्रगती काही राज्यपुरती मर्यादित होती. उदा. महाराष्ट्र

अलीकडे मध्यवर्ती बँका ह्या स्वावलंबनाने आर्थिक शक्ती वाढविण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात जबाबदारी या संस्थेवर पडलेली आहे.

२.८.४ <u>राज्य सहकारी बँक</u> [

राज्य सहकारी बँका ही राज्यातील सहकारी बँकाची शिखर संस्था होय. प्रत्येक राज्यातील जिल्हा मध्यवर्ती बँका एकत्र येऊन शिखर बँकेची स्थापना करतात. शिखर बँक आपले भांडवल जिल्हा मध्यवर्ती सह. बँकाना शेअर्स विकून तसेच नागरिकांना शेअर्स विकून भांडवल एकत्र करते. सर्वसाधारणपणे शिखर बँक ही राज्यातील मोठ्या शहरात किंवा राज्याच्या राजधानीत असते.

विविध मार्गाने जमा केलेले भांडवल प्राथमिक पतपेढ्यांना जिल्हा मध्यवर्ती सह. बँकामार्फत अप्रत्यक्ष कर्जपुरवठा करते. शिखर बँका राज्यातील

जिल्हा मध्यवर्ती सह. बँका आणि राष्ट्रातील नाणेबाजार यामधील दुवा साधण्याचे कार्य करीत असते. १९६९ मध्ये देशात २६ राज्यसहकारी बँका होत्या तर सभासदांची संख्या १२७११ होती.

**सहकारी शेती पतपुरवठा संस्थांची माहिती** [३० जून १९७५]

**कोष्टक क्र. २.५**

| तपशिल | | |
|---|---|---|
| संख्या | – | २६ |
| भागभांडवल निधी [कोटी] | – | १४२ |
| ठेवी [कोटी] | – | ५४६ |
| एकूण खेळते भांडवल [कोटी] | – | ११८७ |

शिखर बँक जिल्हा मध्यवर्ती बँकेची शिखर बँक असते. जिल्हा मध्यवर्ती बँकेमधील असलेले सर्व दोष शिखर बँकेत येतात. सर्वसाधारणपणे शिखर बँकेमध्ये पक्षीय राजकारण घुसलेली असल्यामुळे सहकाराच्या उदात्त हेतुने अस्तित्वात आलेली संस्था स्व:हाकाराची केंद्र बनलेली आहे.

## २.९ दिर्घकालीन कर्जपुरवठा करणारी सह. संस्था :-

### २.९.१ भू – विकास बँक :

भारतीय शेतक–यांना विविध उद्देशासाठी विविध मुदतीच्या कर्जाची आवश्यकता असते. उदा. शेतक–यांना बियाणे खरेदी, खते खरेदी जंतूनाशक औषध खरेदी, इत्यादी कारणासाठी त्रिस्तरीय सहकारी संस्था अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करतात. परंतु शेतक–यांना या व्यतिरिक्त विविध कार्यासाठी उदा. विहिर खोदणे, जमीन सपाटीकरण

करणे इत्यादी कारणासाठी कमीतकमी १० ते १५ वर्षे मुदतीचे कर्ज आवश्यक असते. शेतक-यांना अल्प मुदतीच्या कर्जाची गरज जितकी अधिक असते. तेवढीच गरज दिर्घमुदतीच्या कर्जाची असते, म्हणून पहिल्या भूधारण बँकेची स्थापना १९२० साली करण्यात आली.

भारतीय भूधारण बँकेची रचना व्दिपातळीवरची आहे.

१] प्राथमिक भूधारण अथवा भूविकास बँक

२] मध्यवर्ती भू-विकास बँक

१] <u>प्राथमिक भू-विकास बँक</u> :

प्राथमिक भू-विकास बँक जिल्हा पातळीवरील शाखाव्दारे कार्य करीत असतात. मध्यवर्ती भू-विकास बँकाच्या नियंत्रणानुसार कार्य करतात. मध्यवर्ती भू-विकास बँक या बँकेवर देखरेख ठेवते. बँक मध्यवर्ती भू-विकास बँकेकडून कर्जवाटप करीत असतात. कर्जपुरवठा करीत असताना जमीन मुल्याच्या ५०% इतके रक्कम देतात. याची वसुली वार्षिक हप्त्याच्या साह्याने केली जाते.

या बँका भांडवलाची उभारणी शेअर्स व ठेवी, स्वीकारून करतात. तसेच मध्यवर्ती बँकेकडून घेतलेल्या कर्जाचा वापरही भांडवल म्हणून केला जातो.

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक भू-विकास बँकेचे कार्य इतर राज्यातील बँकापेक्षा फारच चांगले आहे. अलीकडे या बँका शेतक-यांना घरबांधणी, जनावरे खरेदी करणे, गोठा बांधणी इत्यादी कारणासाठीही मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करीत असतात.

या बँकेचे दोषही अनेक आहेत. उदा. वाढत्या व्याजाचा दर, कर्ज देण्यात विलंब, अकार्यक्षमता आणि असमान विकास इत्यादी.

२] मध्यवर्ती भू-विकास बँक :

राज्यपातळीवरील कार्य करणा-या या बँकेचे कार्यक्षेत्र त्या राज्या-पुरतेच मर्यादित असते. शेतक-यांना दिर्घ मुतीकरिता कर्ज पुरविण्याचा प्राथमिक भू-विकास बँकाना कर्जपुरवठा करणा-या उद्देशाने मध्यवर्ती भू-विकास बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे. यांचे कार्य हे प्राथमिक भू-विकास बँक आणि व्यक्तीगत सदस्याच्या साहाय्याने कार्य करतात.

मध्यवर्ती भू-विकास बँक भांडवल उभारणीसाठी दिर्घ मुदतीची ठेवी गोळा करतात. तर काही वेळा शेअर्स विक्री करुन भांडवल उभारणी करतात. तसेच व्यापारी बँका, रिझर्व्ह बँक, सरकार यांचेकडून कर्ज घेवून भांडवल गोळा केले जाते.

नियोजनाच्या कालावधीमध्ये या बँकेने भरीव कामगीरी केलेली आहे. मध्यवर्ती भू-विकास बँकानी आपल्या कार्यक्षेत्रातील शेतक-यांना दिर्घ मुदतीच्या कर्जाची गरज प्राथमिक भू-विकास बँकाच्या सहाय्याने समर्थपणे सोडविण्याचा प्रयत्न केला आहे.

या बँकेबाबत काही दोषही स्पष्टपणे जाणवत आहे, त्यामुळे

[१] विविध राज्यात कर्जावू रक्कम वेगवेगळे आहे.

[२] वाढते व्याजाचा दर

[३] थकबाकीचे प्रमाण अधिक

[४] शेती सुधारणा ऐवजी इतर बाबीवर कर्जपुरवठा करतात.

## २.१० पीक कर्ज योजना :-

डॉ.डी.आर.गाडगीळ याच्या अध्यक्षतेखाली १९४४ साली भारत सरकारने नेमलेल्या शेती पतपुरवठा उपसमीती याच्या शिफारसी मध्ये पीक कर्ज योजना दिसून येते. १९४५ मधील सहकार नियोजन समिती व गोरवाला समिती यांच्याही शिफारसीमध्येही पीक कर्ज

योजना मांडले गेलेली होती.

नियोजनाच्या माध्यमातून ग्रामीण आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. दुस-या पंचवार्षिक योजनेतील हे महत्वाचे वैशिष्ट मानले जाते. परंतु १९६५-६६ मध्ये या योजनेची प्रगती फार मंद गतीने होती. थोडक्यात शेती उत्पादनाच्या गरजेनुसार कर्जपुरवठा करण्यात येत होता.

पीक कर्ज घटक :

शेतक-यांना आवश्यक असणा-या पीक कर्ज रक्कमेचा अंदाज करण्यासाठी पुढील चार घटक सुचविलेले आहे.

"अ" घटक

शेती ही परंपरागत पध्दतीने केली जात असेल, शेती जर पुर्णपणे पावसावर आधारित असेल तर त्या शेतीमधील काम करण्यासाठी येणारा खर्च हा कमी असतो. त्यामुळे अशा शेतक-यांना १/३ रक्कम रोख कर्ज - रुपाने द्यावा.

"ब" घटक

शेतक-यांना बियाणे, रासायनिक खते, औषधे, इत्यादी बाबी-वरील खर्च शक्यतो वस्तू स्वरुपात देण्यात यावी.

"क" घटक

खते, किटकनाशके याचा वापर करण्यासाठी येणारा खर्च हा ५०% पेक्षा जास्त असू नये.

"ड" घटक

शेतमालाची विक्री सहकारी खरेदी-विक्री मार्फत केला जाणार

असेल तर, दिली जाणारी रक्कम पैशाच्या स्वरूपात देण्यात यावी.

पीक कर्ज राबविण्याची पध्दत

जिल्हा मध्यवर्ती बँक हे शेती अधिका-याकडून विविध पीकासाठी किती कर्जपुरवठा केला जावा याचे धोरण मागवले जाते. त्यानुसार सभासदाना कर्जपुरवठा केला जातो.

पीक कर्ज वाटप पध्दत

पीक कर्ज वाटपाची रक्कम तीन भागामध्ये केला जातो. पहिला भाग रोख रक्कमेत द्यावा लागतो. कारण शेतीमधील अंतर्गत मशागतीसाठी तो पैसा खर्च करता येतो. दुसरा भाग हा वस्तू स्वरूपात देण्यात येतो. उदा. बियाणे खरेदी करणे, खते, औषधे इत्यादी, तिसरा भाग हा रोख स्वरूपात दिला जातो.

कर्ज वसुली पध्दत

पीक कर्ज वसुलीची पध्दत सहकारी खरेदी विक्री संस्था मार्फत केला जातो.

जून १९७६ अखेर महाराष्ट्रात सुमारे २० हजार सोसायटीमध्ये २५ लाख सभासदांना २३६ कोटी रूपये पीक कर्ज म्हणून देण्यात आलेले होते. पीक कर्ज योजनामुळे एक समाधानाची गोष्ट घडली गेली ती म्हणजे या कालावधीमध्ये सावकारी कर्ज ९१% कवरून ३७% पर्यंत खाली आहे.

## २.११ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :-

महाराष्ट्रामध्ये सहकारी संस्थेचे अस्तित्व गेल्या ७०-८० वर्षा-पासून आहे. भारतातील सहकार क्षेत्रामध्ये महाराष्ट्राचे स्थान अधिक महत्वाचे आहे. प्रारंभापासून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला सरकारी नेतृत्वा इतकेच समाजसुधारक, प्रगतशिल उद्योगपती, यांचेही

नेतृत्व लाभले आहे. महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळीचे नेतृत्व विशेषत: यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील, धनंजय गाडगीळ, वैकुंठभाई मेहता इत्यादी व्यक्तींचे योगदान लाभलेले आहे. म्हणूनच पीक कर्ज पध्दती, भांडवलातील सरकारी सहभाग शिक्षण इत्यादी कल्पना देशभर स्विकारण्यापुर्वी प्रथम प्रयोग महाराष्ट्रात करण्यात आलेला होता.

महाराष्ट्राचा १९६० चा सहकारी कायदा यादृष्टीने सहकारी युगप्रवर्तक कायदा म्हणून ओळखला जातो. जीवनाच्या विविध अंगात सहकारी चळवळीने प्रवेश केलेला आहे. विशेषत: महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याने या चळवळीला फार मोठे योगदान दिलेले आहे. या योगदानाचे उपयोग कृषी औद्योगिक समाज रचनेचा आदर्श निर्माण करता आला. सर्व खेड्यापाड्यातील जनता सहकारी संस्थेत आली. त्यामुळे ग्रामीण शेतकऱ्याला काही आशा आकांक्षा निर्माण होऊ लागल्या आणि त्यातूनच ग्रामीण विकासाचा वेग वाढला. म्हणून महाराष्ट्रात सहकारी चळवळ ही नुसता चळवळ राहिलेली नसून एक उत्तम अशी अर्थव्यवस्था होऊ पाहत आहे. ग्रामीण जनता सहाकार्याच्या जोरावर एकत्र येवून सहकारी संस्थेची कास धरू पाहात आहे. त्यामुळे सहकारने हिताची साखळी सभासदामध्ये निर्माण करता येऊ लागली.

विशेषत: सहकारी चळवळीच्या रोपट्याचे वेल सांगली, कोल्हापूर आणि नगर जिल्ह्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.

## महाराष्ट्रातील सहकारी सोसायट्यांची आकडेवारी

### कोष्टक क्र. २.६

| जिल्हा | १९६१ – ६२ संस्थांची संख्या | १९६१ – ६२ शेकडा प्रमाण | १९८५ – ८६ संस्थांची संख्या | १९८५ – ८६ शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| मुंबई | ४८२८ | २३.३० | ३७५५ | १४.९८ |
| नाशिक | – | – | ४००९ | १५.९९ |
| पुणे | ५२३९ | २५.२८ | ५६८१ | २२.६७ |
| औरंगाबाद | ४६११ | २२.४४ | ५४४१ | २१.७१ |
| अमरावती | – | – | ३१३२ | १२.४९ |
| नागपूर | ६००० | २८.९६ | ३०८० | १२.१३ |

वरील तक्त्यावरून असे स्पष्टपणे जाणवते की, पुणे प्रांतात विभागामध्ये सहकारी संस्थेचे जाळे फारच पसरलेले आहे. १९६१–६२ मध्ये ५२३९ इतक्या सहकारी संस्था होत्या तर ते प्रमाणे वाढून १९८५–८६ मध्ये ५६८१ झाल्या.

### भारतातील सहकारी क्षेत्रातील महाराष्ट्राचा हिस्सा [१९६७–६८]

| | महाराष्ट्र | भारत | भारताशी टक्केवार |
|---|---|---|---|
| सहकारी संस्थेची संख्या | ३९२५२ | ३३०००० | ११.८ |
| सभासद | ७६००००० | ५५३००००० | १३.७ |
| भागभांडवल[कोटी] | १६० | ५८५ | २७.४ |
| खेळते भांडवल [कोटी] | ९१४ | ३६८३ | २४.८ |

महाराष्ट्राच्या दौ-यावर असताना कै. श्रीमती इंदिरा गांधी एकदा म्हटल्या होत्या, " सामाजिक हित साधण्यासाठी उत्पादनात वाढ करून समाजात त्याचे त्याच वाटप करण्याचे सहकार हे एक प्रभावी माध्यम आहे. व्यवस्थापनाच्या समस्यामुळे सहकारी चळवळीचे हे माध्यम जेवढे प्रभावी होणे आवश्यक होते तेवढे मात्र ते होऊ शकले नाही" पंतप्रधानांची ही खंत रास्त व वस्तुनिष्ठ आहे. कारण सहकार चळवळीत चांगल्या बरोबर काही अनिष्ठ प्रवृत्तीही घुसल्या आहेत. मग लोकशाही पध्दतीने " जो बळी तो कान पिळी " ही अपप्रवृत्ती बळावत चालली आहे. सर्व प्रथम सिमांत शेतकरी हा समर्थ बनला पाहिजे, आणि सामाजिक जाणिवेतून सहकाराचा हा जगन्नाथाचा रथ सर्वांनी ओढला पाहिजे. खुल्या अर्थव्यवस्थेतील या युगात सहकाराचा रथ थांबता कामा नये या जाणिवेनेच काम करावे लागेल.

## २.१२ सांगली जिल्ह्यातील सहकारी चळवळ :-

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीत अग्रक्रम प्रमुख जिल्ह्यामध्ये सांगली जिल्हा येतो. सांगली जिल्ह्यातील सहकार चळवळीस काही राजकीय व्यक्तींचे मार्गदर्शन लाभलेले आहे. तर काही सहकारी संस्थेची प्रगती ही सहकाराच्या वाढीस कारणीभूत आहे. विषेषत: कै. वसंतदादा पाटील, कै. राजारामबापू, मा. विष्णूआण्णा पाटील, मा. प्रकाशबापू पाटील, मा. जयंत पाटील इत्यादी व्यक्तींची नांवे आवर्जुन घ्यावे लागेल.

शेतक-याचे आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी सहकाराचे माध्यम आधिक उपयुक्त असते. हे सांगली जिल्ह्यातील शेतक-यांना समजून आलेले आहे. त्यामुळे ग्रामीण आर्थिक विकासाचा वेग इतर जिल्ह्याच्या मानाने आधिक असलेला दिसतो.

## सांगली जिल्ह्यातील एकूण सहकारी संस्था

### कोष्टक क्र. २.७

| तालुका | १९७०-७१ | शेकडा प्रमाण | १९८४-८५ | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| मिरज | २७० | २६.७५ | ५३७ | २६.६३ |
| तासगांव | १७२ | १६.०५ | ३०१ | १४.३६ |
| वाळवा | २०६ | २०.४१ | ४०१ | १९.१४ |
| खानापूर | ११७ | ११.५९ | २१९ | १०.४५ |
| शिराळा | ७८ | ७.७३ | १८१ | ७.६८ |
| जत | ७२ | ९.२५ | २०६ | ९.७३ |
| आटपाडी | ४६ | ४.५५ | १११ | ५.१९ |
| कवठे महांकाळ | ४९ | ४.८५ | १५४ | ७.५८ |
| एकूण | १००९ | १००. | २०९५ | १००. |

प्रकरण तिसरे

## नांद्रे विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे इतिहास पार्श्वभूमी आणि विकास [१९१६ ते १९९३]

### पार्श्वभूमी : नांद्रे गावाचा परिचय


**३.१ भौगोलिक स्थान :-**

नांद्रे हे गांव सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात आहे. ते सांगलीच्या उत्तरेस १० कि.मी. अंतरावर आहे. या गावाचे उत्तरेस तासगांव तालुक्यातील वसगडे हे गांव आहे. पुर्वेस शिरगांव कवठे व कावजी खोतवाडी आहे. तर पश्चिमेस ब्रम्हनाळ हे गांव आहे. गांवच्या उत्तरेस वेरळा नदी तर पश्चिमेस बारमाही वाहणारी कृष्णा नदी आहे. नांद्रे गावाचे स्थान सोबतच्या नकाशात दाखविले आहे.

**३.२ भूमी उपयोग :-**

नांद्रे गावचे भौगोलिक क्षेत्र २५७४.६२ हेक्टर आहे. या एकूण जमिनीचा वापर [१९९२-९३ मध्ये] खालीलप्रमाणे होते.

| | हेक्टर आर |
|---|---|
| लागवडी योग्य जमिनीचे क्षेत्र | २३२८.९३ |
| बिगर शेती/उपयोगात नसलेली | ९२.०५ |
| ओसाड/ मशागतीस अयोग्य | ४७.९३ |
| कायमची कुरणे व इतर चारा कुरणे | ५२.८८ |
| किरकोळ झाडे झुडपे | २.६२ |
| चालू पडिक | २८.४६ |
| इतर पडिक | २१.७५ |



उत्तर
तासगांव तालुका
वाळवा तालुका
कवठेमहंकाळ तालुका
सांगली
मिरज
कोल्हापूर जिल्हा
नदी
राष्ट्रीय व राज्य मार्ग
रेल्वेमार्ग
मिरज तालुका
स्केल - 1:25,000

**आधार :** नांद्रे ग्रामपंचायत कागदपत्रे प्रशिक्षण व भेट योजना, कृषी ग्रामविस्तारक अधिकारी नांद्रे.

नांद्रे गावाचा अलीकडील काळात सहकारी व खाजगी जल - सिंचन सोयी मोठ्या प्रमाणात वाढल्याने लागवडीखालील जमीनीच्या क्षेत्रात उल्लेखनीय वाढ झाल्याचे दिसून येते.

## ३.३ भूपृष्ठरचना :-

नांद्रे गावची समुद्रसपाटीपासूनची उंची ५४५ मीटर आहे. पुर्वेस जास्त उंचीचा भाग आहे, तर पश्चिमेस व दक्षिणेस कमी उंचीचा भाग आहे. गांवच्या उत्तरेस वेरळा नदी तर पश्चिमेस कृष्णा नदी वाहते. वेरळा नदीला फक्त पावसाळ्यात पाणी येत असल्याने बहुसंख्य खाजगी आणि सहकारी जलसिंचन योजना या कृष्णा नदीतूनच शेतीला पाणीपरुवठा करतात. याशिवाय विहीर व बोअरवेलवर आधारित जलसिंचनाची सोय आहे. बोअरवर जलसिंचनाचे क्षेत्र अगदीच कमी आहे. गावातील एकूण क्षेत्रापैकी ८०% ते ८५% क्षेत्र बागायत शेतीने व्यापली आहे.

## ३.४ जमीन :-

हा भाग दख्खन पठाराचा आहे. बेसॉल्ट किंवा अग्नीजन्य खडकाने युक्त असून याच खडकापासून तयार झालेली जमीन या गावात आढळते. गावातील सर्व शेतजमीनीत सरासरी खालील प्रमाणे घटक आढळतात.

१] आम्ल विम्ल निर्देशांक [पी.एच] ७.५ ते ८.५

२] क्षारता [ ] ०.२५ ते ०.३०

३] सेंद्रिय कार्ब [दरशेकडा] ०.४०

४] उपलब्ध स्फूरद [हेक्टरी किलो] २५ ते ६०

५] उपलब्ध पालाश्र [ हेक्टरी किलो ] २८० ते ३००

**आधार** : मृद चाचणी प्रयोगशाळा, सांगली
कृषी ग्रामविस्तारक अधिकारी, नांद्रे

गावात काळी, तांबडी व माळरान या प्रकारची जमीन आढळते. काळ्या जमीनीचे प्रमाण अधिक असून ती अधिक खोलीचे आढळते. काळ्या जमीनीत सेंद्रीय द्रव्याचे प्रमाण अधिक असून शेती-साठी ही जमीन अधिक उपयुक्त आहे. पण अतिरिक्त जलसिंचन किंवा पाण्याचा अयोग्य वापर यामुळे क्षारयुक्त जमीन हे नांद्रे गावाच्या शेतीचे संकट बनले आहे. माळरान आणि तांबड्या जमीनीचे क्षेत्र हे एकूण क्षेत्राच्या मानाने कमी आहे.

## ३.५ हवामान :-

नांद्रे गावचा प्रदेश हा मौसमी हवामानाच्या पट्टयात येतो. उन्हाळा, हिवाळा व पावसाळा हे तीन ऋतू आहेत. येथील उन्हाळा कडक असून, हिवाळ्यात तापमान सर्वसाधारणपणे थंड असते. येथील किमान तापमान २४ सेल्सियस तर कमाल तापमान ३८ सेल्सियस पर्यंत जाते. काही वेळा हिवाळ्यात तापमान याहीपेक्षा खाली येते.

## ३.६ लोकसंख्या :-

१९६१ ते १९९१ या काळात नांद्रे गावच्या लोकसंख्येत सातत्याने वाढ झालेली आहे. कोष्टक क्रमांक ३.१ मध्ये लोकसंख्येचे लिंगभेदानुसार वर्गीकरण दाखविले आहे.

**कोष्टक क्र. ३.१**

**नांद्रे गावातील लोकसंख्येचे लिंगभेदानुसार वर्गीकरण**

| वर्षे | पुरुष | शेकडा प्रमाण | स्त्रिया | शेकडा प्रमाण | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १९६१ | ३८१८ | ५०.८७ | ३३०१ | ४९.१३ | ६७१९ |
| १९७१ | ४५३३ | ५१.१२ | ४३३५ | ४८.८८ | ८८६८ |
| १९८१ | ४८०४ | ५१.१८ | ४५८२ | ४८.८२ | ९३८६ |
| १९९१ | ५१११ | ५०.८८ | ४९३५ | ४९.१२ | १००४६ |

**आधार** : जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, सांगली
उपनिर्देशक, जनगणना कार्य, महाराष्ट्र मुंबई

१९६१ ते १९९१ या काळात नांद्रे गावच्या लोकसंख्येत सातत्याने वाढ झालेली दिसून येते. तथापि या वाढीचा वेग कमी असल्याचे दिसते. १९८१ ते १९९१ या १० वर्षांच्या काळात लोकसं - ख्येत अवधी ६६० लोकांची भर पडली. ही वाढ अत्यंत कमी आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे १९७१ पासून नांद्रे गावच्या जनगणेत नांद्रे नावरसवाडी आणि कावजी खोतवाडी या तीन गावचा समावेश होता. पण १९८६ मध्ये कावजी खोतवाडी या गावची स्वतंत्र ग्राम - पंचायत झाली. त्यामुळे या गावचा समावेश १९९१ च्या जनगणनेत करण्यात आला नाही. १९९१ च्या जनगणनेत नावरसवाडीची लोकसंख्या ५८७ आणि नांद्रे गावची लोकसंख्या ९४५९ अशी एकूण लोकसंख्या १००४६ आहे.

12569
A

१९९१ च्या जनगणनेनुसार नांद्रे गावच्या एकूण लोकसंख्येत [ १००४६ ] पुरूषांचे प्रमाण ५०.८८% तर स्त्रियांचे प्रमाण ४९.१२% इतके आहे.

३.७ **पीक पध्दती** :-

नांद्रे गावात शेतजमीनीचे एकूण २३३३ खातेदार आहेत. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १ हेक्टरपेक्षा कमी | - | १०५५ |
| १ ते २ हेक्टर | - | ९४९ |
| २ ते ३ हेक्टर | - | २१२ |
| ३ ते ४ हेक्टर | - | ९५ |
| ४ ते ५ हेक्टर | - | २२ |
| | एकूण | २३३३ |

याचाच अर्थ ४०% खातेदार हे १ हेक्टरपेक्षा कमी शेतजमीन असलेले आहेत.

नांद्रे गाव शेतीप्रधान आहे. गावातील मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. त्यामुळे ग्रामस्थांचे आर्थिक जीवन शेतीशी निगडीत आहे. म्हणजेच नांद्रे गावची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे.

अलीकडच्या काळात रासायनिक खताच्या वाढत्या किंमती आणि शेतक-यांना न परवडणारा ऊसाचा दर, त्यामुळे गावात ऊस पीकाचे क्षेत्र घटत चालले असून सोयाबीन पीकाचे क्षेत्र वाढत चाललेले आहे. खालील कोष्टक क्रमांक ३.२ यात १९९० - ९१ मधील पीक पध्दत व जून १९९३ मध्ये अस्तित्वात असलेली पीक पध्दत दाखवलेली आहे.

**कोष्टक क्र. ३.२**

**पीक पध्दती**

| पीके | १९९०-९१ [हेक्टर] | जून १९९३ [हेक्टर] |
|---|---|---|
| खरीप ज्वारी | ८.०० | २.०० |
| हायब्रिड ज्वारी | १४.३५ | - |
| भुईमूग | - | १८.०० |
| भाजीपाला | १०.९० | २८.०० |
| तूर | १.८६ | २.३४ |
| मूग | ०.८९ | १.२३ |
| मटकी | ०.४२ | - |
| सोयाबीन | ९३५.११ | १४७०.८३ |
| द्राक्षबाग | - | २.३० |
| भात | २.३८ | १.२३ |
| गहू | २८.०५ | - |
| रब्बी ज्वारी | १८९.२३ | - |
| तंबाखू | १.५५ | - |
| फळबागा | - | १०.०० |
| ऊस | ९९५.९७ | ७२३.१७ |
| चारा | ४०.०० | ६९.८३ |
| हरभरा | १००.९२ | - |
| लागवडीखालील एकूण क्षेत्र | २३२८.९३ | २३२८.९३ |

**आधार** : नांद्रे ग्रामपंचायत कागदपत्रे
प्रशिक्षण व भेट योजना, कृषीग्राम
विस्तारक अधिकारी नांद्रे

वरील कोष्टक क्र. ३.२ वरुन असे दिसून येते की, शेतक-यांनी ज्वारी, ऊस इत्यादी पीकाचे प्रमाण कमी करुन सोयाबीण, भाजीपाला द्राक्षे यासारखी पीके घेण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे.

## ३.८ जलसिंचन सोय :-

संपूर्ण महाराष्ट्राचे सांगली जिल्ह्यामधील नांद्रे गावाकडे लक्ष वेधून राहीलेली गोष्ट म्हणजे या गावातील जलसिंचन योजना होय. एकूण जमीनीच्या ८५% ते ९०% जमीनी जलसिंचनानी व्यापलेली आहे. याचे कारण म्हणजे गावापासून ५ कि.मी. अंतरावरुन कृष्णा नदीतून पाण्याचा उपसा करुन संपूर्ण गावाच्या शेत-जमीनीला पाणीपुरवठा केला जात आहे.

कोष्टक क्रमांक ३.३ पुढीलपानावर पहा

| अ. नं. | योजनेचे नांव | स्था. वर्ष | प्रत्यक्ष चालू वर्ष | सभासद मार्च९३ | योजनेचे जलाशय क्षेत्र[एकर] | दर एकरी कर्ज | अर्थसहाय्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | कृष्णाप्रसाद पाणीपुरवठा योजना | १९६९ | १९७० | ६० | १३० | कर्जमुक्त | भूविकास बँक सांगली |
| ०२. | भाग्यलक्ष्मी पाणीपुरवठा योजना | १९७२ | १९७४ | ५७ | १५० | कर्जमुक्त | सांगली बँक |
| ०३. | वेरळामाई पाणीपुरवठा सह. संस्था | १९८२ | १९८३ | ३५ | ८० | ५,००० | भूविकास बँक सांगली |
| ०४. | बिरदेव पाणी सह. संस्था | १९८३ | १९८५ | २७ | ६० | ७,००० | -"- |
| ०५. | वसंत पाणीपुरवठा सह. संस्था[१,२,३] | १९८३ | १९८५ | २९७ | ७५८ | ७,८०० | -"- |
| ०६. | वसंत पाणी पुरवठा सह. संस्था नं४ | १९८४ | १९८६ | ८० | २०० | ५,६०० | -"- |
| ०७. | शेतकरी सह. उपसा जलसिंचन योजना, नांद्रे नं. १ | १९८३ | १९८५ | २६४ | ६६० | ११,८०० | -"- |
| ०८. | शेतकरी सह. उ. जल. योजना नं. २ | १९८८ | १९९२ | २१३ | ६०० | २५,००० | -"- |
| ०९. | विकास सह. पाणीपुरवठा संस्था | १९९० | १९९३ | ३८२ | ८२० | १७,२०० | नांद्रे वि. का. सह सोसायटी |
| १०. | जीवन पाणी पुरवठा संस्था | १९९० | १९९२ | २१ | १३५ | १४,००० | भूविकास बँक सांगली |
| ११. | भाग्योदय पाणी पुरवठा योजना | १९७४ | १९७६ | १३६ | ३६० | -- | म. रा. सिं. वि. मंडळ, पुणे |
| १२. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त सहकारी शेती संस्था | १९७४ | १९७६ | ७५ | ५२ | -- | एकात्मिक समाज केंद्र, मिरज |
| | | एकूण | | १६४७ | ४००५ | | |

## ३.९ पशुपक्षी :

शेतकरी वर्ग मोठ्याप्रमाणात असल्याने शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन हा व्यवसाय केला जातो. जुलै, १९९३ अखेर गांवातील एकूण पशूंची संख्या ४६७२ तर कोंबड्यांची संख्या १०७२ इतकी होती.

## ३.१० आरोग्य सुविधा :

गावामध्ये एक प्राथमिक आरोग्य केंद्र असून तेथे सहा खाटांची व्यवस्था आहे. या आरोग्य केंद्रात २ वैद्यकीय अधिकारी, ३ पर्यवेक्षक, व १० कर्मचारी काम करतात. या शिवाय ५ खाजगी दवाखाने आहेत.

## ३.११ पाणी पुरवठा :

गावामध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा ग्राम-पंचायतीमार्फत नळाद्वारे केला जातो. हा पाणी पुरवठा कृष्णानदीतून केला जातो. दररोज सरासरी ५.८ लाख लिटर पाणी पुरवठा लोकांना उपलब्ध करून दिला जातो.

## ३.१२. पोस्ट ऑफिस व दूरध्वनी :

गावात पोस्ट ऑफिसची सोय आहे. याशिवाय दूरध्वनी केंद्राचे स्वतंत्र कार्यालय आहे. सध्या खाजगी व सहकारी संस्थांचे मिळून १५० दूरध्वनी आहेत. मार्च, १९९४ पर्यन्त २०० ग्राहकांची दूरध्वनीची मागणी आहे. जानेवारी १९९४ पासून एस्.टी.डी. व आय्. एस्. डी. ची सोय झालेली आहे.

३.१३ **विद्युत पुरवठा :**

सध्या नांद्रे गांवात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे एक शाखा कार्यालय आहे. गाव व शेती समूह धरून गांवात २१ ट्रान्सफॉर्मर आहेत. जुलै १९९३ अखेर ८०५ घरगुती, १४४ व्यापारी, २९ औद्योगिक कनेक्शनस आहेत. शिवाय विहीरीसाठी कमी दाबशक्तीचे २७० तर मोठ्या योजनेचे ६ उच्च दाब शक्तीचे ट्रान्फॉर्मर्स आहेत.

३.१४ **बँका :**

नांद्रे गावात सध्या एक राष्ट्रीयीकृत बँक, २ सहकारी बँका व एक सुचित बँक [शाखा] आहे. गावातील बँकांची शाखा त्याच्या खातेदारांची संख्या ठेवी व कर्ज याचे तपशील पुढीलप्रमाणे

**कोष्टक क्रमांक ३.४**

**बँकांविषयी माहिती.** [दि. ३१ मार्च,१९९४अखेर]

| बँकेचे नांव | स्थापना [गावातील] | खातेदारांची संख्या | ठेवी लाखात | कर्ज लाख |
|---|---|---|---|---|
| बँक ऑफ महाराष्ट्र | १५.०८.६९ | ६,००० | १.७० | ०.८० |
| दि रत्नाकर बँक | ०१.१०.७३ | १०,००० | २.४० | १.२४ |
| सांगली जि.मध्य.बँक | ०७.०८.७८ | ५,६०१ | १.०२ | २.५० |
| शेतकरी सह. बँक लि. | १४.१०.८७ | ४,७५० | १०५.६२ | २३०.१९ |

आधार : बँकेच्या तपशीलावरून

३.१५ **सहकारी पत संस्था :**

नांद्रे गावात ६ सहकारी नागरी पत संस्था आहेत. त्यापैकी अलीकडे स्त्रीयांनी चालवलेल्या दोन सहकारी पत संस्था आहेत.

**कोष्टक क्रमांक ३.५**

सहकारी पतसंस्था

[आकडे लाखात]

| संस्थेचे नांव | स्थापना | सभासद | ठेवी | कर्ज |
|---|---|---|---|---|
| दत्त नागरी सह.पतसंस्था | ११/४/७५ | ४८० | १५.९० | १३.०४ |
| शेतकरी सह.ना.पतसंस्था | ९/२/८७ | ५३२ | १२.९४ | १७.९४ |
| महावीर ना. पतसंस्था | १९/२/८७ | ३५० | ४.९४ | ६.२७ |
| विकास बिगर सह.संस्था | - | - | - | - |
| प्रियदर्शनी महिला पतसंस्था | १४/१०/९३ | ५६८ | .१५९ | ३.४६ |
| लक्ष्मीबाई महिला पतसंस्था | ७/१२/९३ | ३७१ | .४४ | १.१२ |

बँकेच्या तपशिलावरुन

## ३.१६ दुग्ध सहकारी संस्था :-

नांद्रे गावामध्ये सहकारी तत्वावर चालणारे दोन दुधसंस्था आहेत. या संस्थेशिवाय चितळे डेअरी फर्म व थोटे डेअरी अशा दोन खाजगी संस्था आहेत. तर काही व्यक्ती गवळीच्या साहाय्याने दुध खरेदी करतात.

दोन दुध सहकारी संस्थेचे ३१ मार्च ९३ ते ९४ अखेरचे तपशिल पुढीलप्रमाणे -

**कोष्टक क्र. ३.६**

सहकारी दुग्ध संस्था

| संस्थेचे नांव | स्थापना | सभासद | म्हैस दुध | गाय दुध | भाग-भांडवल |
|---|---|---|---|---|---|
| नांद्रे दुधपुरवठा सह. संस्था | १३/१२/५६ | १४९२ | ४७३४५६ लीटर | ११३२४६ लीटर | २९३००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| महावीर दुध पुरवठा सह. संस्था | १९७९ | ९५३ | ८३९८३ | ६५१३३ |

### ३.१७ ग्राहक सह संस्था :-

नांद्रे हे गांव राजकीयदृष्ट्या प्रभावीत गाव म्हणून ओळखले जाते. गावातील बेकारीची संख्या पाहून युवक वर्गानी एकत्र येवून श्री. दादासो पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली अपना बझार ग्राहक सह. संस्थेची स्थापना करण्यात आली. नाममात्र नफेवर ही संस्था चालवली जाते. या संस्थेचा महत्वाचा उद्देश असा आहे की, ग्राहकांना उत्तम दर्जाची जीवनावश्यक वस्तू रास्त भावात मिळावीत व खाजगी व्यापा-यांकडून ग्राहकाची होणारी फसवणूक टाळावी या उद्देशानी स्थापना केलेली आहे. या संस्थेची १० महिन्याच्या कालावधीतील तपशिल पुढीलप्रमाणे -

**कोष्टक क्रमांक ३.७**

अपना बझार ग्राहक सह संस्था [ ३१ मार्च १९९४ ]

| स्थापना | सभासद | ठेव | वार्षिक उलाढाल | अर्थसहाय्य |
|---|---|---|---|---|
| ७/६/१९९३ | ४८९ | २९७०० | १६३९२१५ | ५५००० [सां. जि. बँक] |

### ३.१८ क्रीडा व व्यायाम संघटना :-

गावातील लोकांचे आर्थिकहीत वेगवेगळ्या सह. संस्थेमार्फत साधले जात असताना, मुलाच्या शारिरीक कल्याणाकडेही लक्ष दिले आहे. त्यामध्ये विशेषत: रत्नविजय क्रीडा व व्यायाम मंडळ, नवयुवक संघटना

समता मित्रमंडळ या संघटनेकडून विशेष कार्य केले जाते.

## ३.१९ नाद्रि विविध कार्यकारी सह संस्था नाद्रि यांचे परिचय व कार्याचे अवलोकन :-

### प्रास्ताविक :

भारत या देशाला विकासनशील राष्ट्र म्हणून ओळखले जाते. जगाच्या १५% इतकी लोकसंख्या भारतामध्ये एकवटलेली आहे. या लोकसंख्येवर नियंत्रण करण्यासाठी अनेक प्रभावी मार्गाचा अवलंब केला जातो आहे. तरीही त्याचा म्हणावा तसा प्रभाव पडलेला नाही. या देशामध्ये जवळजवळ ८०% भाग खेड्याने तर फक्त २०% भाग शहराने व्यापलेला आहे. सर्वसाधारणपणे भारत हा खेड्याचा देश आहे, असे म्हणावे लागेल. जर खेड्याचा देश असेल तर त्याचा आर्थिक विकासाचा वेग हा मंदच असतो.

### अविकसीत देशाची व्याख्या :

ज्या देशाचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न अमेरिका, इंग्लंड, रशिया फ्रान्स, जपान या देशापेक्षा कमी आहे त्या देशास अविकसीत राष्ट्र असे म्हणतात.

१९४७ पुर्वी भारतीय शेतकरी हा कर्जाने ग्रासला होता. सावकाराचे मुद्दलामधील व्याज या समीकरणाचे कोडे तो जिवंत असू - पर्यंत सोडवू शकत नव्हता. त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सहकारी माध्यमाचा वापर करुन हे कोडे सोडविण्याचे प्रयत्न करीत आहेत.

शेतीप्रधान राष्ट्राचा सामाजिक आर्थिक हित साधायचे असेल तर शेतीला प्राधान्य दुयावे लागेल. आणि हा प्रयत्न केला जावू लागला. यामध्ये सह पतसंस्थेच्या त्रीस्तरी रचनेमध्ये प्राथमिक सहपतपुरवठा संस्थेची

स्थापना करण्यात आली. या पतपुरवठा संस्थेमार्फत कर्जपुरवठा करणे, वेगवेगळ्या सेवा पुरविणे, जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे, इत्यादी गोष्टींची पुर्तता सह. पतपुरवठा संस्थेमार्फत केला जातो आहे. आणि या कार्यालाच विविध कार्यकारी सह. संस्था असे म्हटले जावू लागले.

## ३.२० नांद्रे विविध कार्यकारी सह संस्था नांद्रे

### पार्श्वभूमी व इतिहास :

नांद्रे हे गांव सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात आहे. गावातील जवळजवळ ७५% लोक शेतीवर अवलंबून आहेत. गावचे भौगोलिक क्षेत्र २५७४.६२ हेक्टर इतके आहे. तर समुद्रसपाटीपासूनची उंची ५४५ मीटर आहे. नांद्र्यामध्ये शेती हा मुख्य व्यवसाय केला जातो. या व्यवसायाचा विकास करण्यासाठी १५ ऑगस्ट १९१६ मध्ये "क॥ नांद्रे परस्पर सहकार मंडळ नांद्रे " या नांवाने संस्थेची स्थापना करण्यात आली.

### क ॥ नांद्रे परस्पर सहकार मंडळ नांद्रे

सुरुवातीला गावामध्ये सावकारी पध्दतीने केला जाणारा कर्जपुरवठा जवळजवळ ६०% इतका होता. शेतकरी हा जुनाट सावकारी पध्दतीस अक्षरशः त्रासला होता. या पध्दतीपासून मुक्त करण्यासाठी १९१६ मध्ये " क नांद्रे परस्पर सहकार मंडळ " या सहकारी संस्थेची स्थापना करण्यात आली. सुरुवातीला २६ व्यक्तींनी एकत्र येवून ५ रुपये प्रमाणे १ शेअर्स, व १ रुपये प्रवेश फी याप्रमाणे भागभांडवल गोळा केले.

सुरुवातीला या संस्थेचे चेअरमन म्हणून श्री. पिरगोंडा सातगोंडा पाटील [कोटगोंडा] यांची नेमणूक करण्यात आलेली होती. तर

सेक्रेटरी म्हणून काशीनाथ कुलकर्णी हे काम करीत होते. सुरुवातीलाही संस्था कर्ज देण्याचेच काम करीत होती. या कर्जावर दरसाल ६% पर्यंत व्याज आकारला जात होता.

३.२१ **१९१६ ते १९४७ पर्यंत या संस्थेची प्रगती :-**

**उद्देश :**

सहकार तत्व, कायदा, धोरण यास अनुसरुन शेअर्स, व ठेव रुपाने भांडवल गोळा करुन, सभासदामध्ये काटकसर, स्वावलंबन, परस्परसाह्याची भूमीका राबवली जात होती. सभासदाची उन्नती करण्यासाठी कमीत कमी नफा घेवून आधिक अधिक कर्जपुरवठा करणे हा मुख्य उद्देश होता.

**कार्यक्षेत्र :**

नांद्रे, नावरसवाडी, खोतवाडी.

**सभासद :**

**कोष्टक क्र. ३.८**

| वर्षे | सभासद संख्या |
|---|---|
| १९१६ | २६ |
| १९३० | ११४ |
| १९४७ | २०१ |

**आधार :** संस्थेची कागदपत्रे

१९१६ मध्ये २६ व्यक्तींनी एकत्र या संस्थेची स्थापना केली. १९४७ पर्यंत त्यात फक्त १७५ सभासदांची वाढ झालेली आहे.

**भागभांडवल :**

माणसी ५ रुपयेप्रमाणे एक शेअर्स व १रुपये प्रवेश फी या रुपाने भागभांडवल गोळा केला जात होता. १९१६ मध्ये संस्थेचे फक्त १५० रु. इतकेच भांभभांडवल गोळा केलेले होते. १९४७ पर्यंत त्यात १० पटीने वाढ होवून १५०० रुपये गोळा केले. या कालावधीमध्ये सरकारकडून भागभांडवल मिळत नव्हते.

**ठेव :**

या संस्थेच्या स्थापनेपासून ठेवी गोळा केली जात होती. सुरुवातीला ठेवीचे अल्पप्रमाण होते. कारण लोकांचा सहकारी संस्थेवर फारसा विश्वास नव्हता. १९४७ पर्यंत जवळजवळ ६००० रुपये ठेवी गोळा करण्यात आलेली होती.

**कर्ज :**

नांद्रे येथील शेती पुर्णपणे पावसावर आधारित होती. त्यामुळे शेतीला आवश्यक कारणासाठी कर्ज उपलब्ध केला जात होता. या कालावधीमध्ये सावकारी कर्ज पध्दतीचे प्रमाण जास्त होते. शेतक-यांना जर जादा कर्ज पाहिजे असेल तर तो शेतकरी सावकाराकडे जात असे. या संस्थेकडून मिळणारा कर्जपुरवठा हा संस्थेच्या ठेवी व भागभांडवलातून केला जात होता. शेतक-यांना दिल्या जाणा-या कर्जावरील व्याजाचा दर दरसाल ६% इतका होता.

**: महावीर सह. संस्था नांद्रे :**

नांद्रे परस्पर सहकारी संस्थेमधून काही व्यक्ती बाहेर पडून १९४२ मध्ये महावीर सहकारी संस्थेची स्थापना केली. विशेषत: सकळे,पाचोरे चौधरी, चौगुले या भावकीतील व्यक्तींनी एकत्र येवून या संस्थेची स्थापना

केली. यावेळी चेअरमनपद श्री.बाबुराव आण्णाजी चौगुले यांना देण्यात आले. तर सेक्रेटरी म्हणून भाऊअंत एकाजी कुलकर्णी हे काम पाहात होते.

परंतु या संस्थेची प्रगती फारशी झालेली नाही. संस्थेकडून शेतक-यांना कर्ज उपलब्ध करून दिलेला होता. परंतु या कर्जाची वसुली शेतक-यांच्याकडून करता आले नाही. १९४७ मध्ये या संस्थेनी क॥ नांद्रे परस्पर सहकार मंडळामध्ये विलीन करावे लागले.

१९१६ ते १९४७ पर्यंत या संस्थेच्या प्रगती साठी अनेक व्यक्तींनी प्रयत्न केलेले होते. त्यामध्ये

१] पिरगोंडा सातगोंडा पाटील [कौटगोंडा]

२] रायगोंडा दादा पाटील [पांढरे]

३] ॲड. बी. बी. चौधरी

४] चिंतामणी महादेव जोशी

५] जिनगोंडा पाटील

इत्यादी व्यक्तींनी चेअरमन म्हणून काम पाहिले. तर संस्थेच्या प्रगती-साठी संस्थेला आवश्यक असणारे ताळेबंद ठेवण्याचे काम

१] काशीनाथ कुलकर्णी

२] भाऊ जिन्नाप्पा कुपवाडे

३] भाऊराव चौधरी

या व्यक्तींनी केले.

**<u>१९१६ ते १९४७ पर्यंत संस्थेच्या प्रगतीचे कोष्टक</u>**

**कोष्टक क्र. ३.९**

| संस्थेचे नांव | सभासद संख्या | ठेवी | भाग भांडवल | व्याजाचा दर | नफा |
|---|---|---|---|---|---|
| परस्पर सह.मंडळ क॥ नांद्रे. | २०१ | ६००० | १५०० | ६% | – |

**आधार :** संस्थेचे कागदपत्र

या संस्थेची १९४७ पर्यंत प्रगतीचा आढावा घेत असताना सुरवातीला २६ व्यक्तींनी एकत्र येऊन या संस्थेची स्थापना केली. १९४७ पर्यंत १७५ सभासद वाढ होवून ते २०१ पर्यंत वाढले. भागभांडवलापेक्षा ठेवीचे प्रमाण जास्त होते. या कालावधीमध्ये शासनाकडून भांडवल गुंतवणूक केली जात नव्हती.

### ३.२२ १९४७ नंतर संस्थेच्या प्रगतीचा आढावा :-

**१९४७ ते १९६० पर्यंतची संस्थेची प्रगती :**

कमी व्याज दरामध्ये कर्जपुरवठा करून सावकारी कर्जपध्दत कमी करण्याचे प्रयत्न या संस्थेकडून केला जात होता.

१९४८ मध्ये क ाा नांद्रे परस्पर सहकारी मंडळ नांद्रे हे नांव बदलून , सर्व सेवा देणारी त्यामध्ये, जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे, शेतक-यांना कर्जपुरवठा करणे, गरजा भागविणे, इत्यादी कार्य केले जावू लागले.

**१९४७ ते १९६० या कालावधीमधील प्रगतीचे निवडक दर्शन**

**कोष्टक क्र. ३.१०**

| तपशिल | १९४८ | १९५१ | १९५४ | १९५७ | १९६० |
|---|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | १७४ | १९८ | २५३ | २७८ | ०७० 532 |
| शेअर्स भांडवल | २२९५ | ३५७५ | ८८०० | १६१६० | ४८९५० |
| खेळते भांडवल | १८०४६ | २०२०० | ४४३५३ | ५९९७८ | १३६०७० |
| निव्वळ नफा | ७५ | २१२ | १३४२ | ४१४९ | ५६६८ |
| सभासद व बिगर सभासद ठेवी | १००७३ | १७१६ | २८०६१ | ३१६७४ | ५९९०८ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ४९४२ | ५६४६ | ६२०८ | ७६९७ | १२६४० |

**आधार : संस्थेच्या ताळेबंदावरून**

१] सभासद संख्या :

कोष्टक क्रमांक ३.१० वरुन १९४९ मध्ये १७४ सभासद होते त्यामध्ये वाढ होवून १९६० पर्यंत ५३२ इतके झाले. यावरुन असे सांगता येईल की, " स्वातंत्र्योत्तर कालावधीमध्ये शेतक-यांना तारणारी संस्था कोणती असेल तर ती संस्था म्हणजे सहकारी संस्था ही होय " कारण स्थापनेच्या वेळी फक्त २६ सभासद होते. तर १९४७ पर्यंत २०१ पर्यंत वाढ झाले. तीस वर्षाच्या कालावधीमध्ये वाढीचे प्रमाण अत्यल्प होते असे म्हणावे लागेल.

२] शेअर्स भांडवल :

१९४८ मध्ये सभासदाकडून मिळालेले शेअर्सरुपाने भागभांडवल रुपये २,२९५/- इतके होते त्यामध्ये वाढ होवून १९६० पर्यंत २२,९५०/- रुपये झाले.

३] खेळते भांडवल :

स्वातंत्र्योत्तर कालावधीच्या पहिल्या वर्षी संस्थेचे खेळते भांडवल रुपये १८,०४६/- इतके होते तर १९६० पर्यंत यामध्ये आठपटीने वाढ होवून १,३६,०७०/- रुपये झाले.

४] निव्वळ नफा :

नियोजनाच्या माध्यमाने ग्रामीण विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला जात होता. यासाठी सहकारी संस्था " ना नफा ना तोटा " या तत्वांनी चालविली जात होती. १९४८ मध्ये या संस्थेला फक्त ७५ रुपये इतकाच नफा झाला. १९६० पर्यंत ते प्रमाण थोडेसे वाढून ५६६८ रुपये पर्यंत वाढले.

५] ठेवी :

वरील कोष्टकावरुन सुरुवातीला १००७३ रुपये ठेव होती परंतु १९५१ मध्ये फारच प्रमाण कमी होवून फक्त १७१६ रुपये इतकेच राहिले.

तेथून वाढ होवून ११९०८ पर्यंत वाढले. विशेषत: सभासद व बिगर सभासदांकडून गोळा केलेले होते. १९५१ मध्ये ठेवीचे प्रमाण कमी होण्याचे कारण मात्र समजू शकले नाही.

६] <u>रिझर्व्ह फंड</u> :


नफ्यातील काही भाग फंडामध्ये समावेश केला जातो. सुरुवातीला ४९६२ रुपये इतके या फंडाची रक्कम होती त्यात वाढ होवून १२६४० रुपये झाली.

## <u>सांगली जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचे मानकरी</u>

गावातील शेतक-यांना आवश्यक असणारे शेतीउपयोगी वस्तु पुरवीत असताना शेतक-यांना आवश्यक तेवढे कर्ज उपलब्ध करुन देत असे. आणि स्वत: मात्र आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊन काम करीत होते. सन १९५७ मध्ये या संस्थेला मे. डेप्युटी रजिस्ट्रार कडून जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाचे बक्षिस या संस्थेला दिले गेले. सभासद व बिगर सभासदांच्या ठेवीवरच ही संस्था चालविली जात होती. कोणत्याही बँकेचे अगर इतर संस्थेकडून आर्थिक सहाय्य न घेता चालविली जात होती. म्हणून प्रथम क्रमांकाचे बक्षिस दिले गेले होते.

**सन १९४८ ते १९६० या कालावधीमध्ये शेअर्स भांडवलामध्ये किती पटीने वाढ त्याचे स्तंभआलेख**

**स्तंभआलेख**



## कोष्टक क्रमांक ३.१९

### १९७१ ते १९८० मधील संस्थेच्या प्रगतीची वाटचाल

| अ. क्र. | त प शी ल | १९७१ | १९७२ | १९७३ | १९७४ | १९७५ | १९७६ | १९७७ | १९७८ | १९७९ | १९८० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ |
| ०२. | सभासद संख्या | ८३५ | ८४३ | ८४२ | ८६५ | ८५८ | ८९९ | ९१४ | ९३९ | ९६७ | १००५ |
| ०३. | शेअर भांडवल | २५६९०५ | २७३२३५ | २५६८१० | २८२७६५ | ३०५९६० | ३१०२५० | ३३४७४५ | ३४५३०० | ३५५१९५ | ३६७४१५ |
| ०४. | सभासद ठेव | ३३३८३ | २०३९३ | ३५५९८ | २६३९८ | २११३३ | २४७०३ | २९२६६ | ३७९९८ | ३६७६८ | ४०५८४ |
| ०५. | बिगर सभासद ठेव | २७५६७ | १९१४१ | १६६६१ | १५०१६ | ३७०२ | ५७०७ | ४५२५ | ३१०२ | २१६२ | २१०२ |
| ०६. | कर्जवाटप | ७९९२२२ | १३७८७७६ | १०७४५८१ | ७७७७११२ | ९१९७४२ | ४४६३२४ | ५९६९६४ | ५०४२१२४ | ५५९६९९ | ६४१४२१ |
| ०७. | थकबाकी | १२८५७४ | ३१८६११ | २०५६१ | २२०४३२ | १७८००७ | १५४८३८ | १२९३८७ | १२०१९६ | १५१३९४ | १२५३१९ |
| ०८, | बँक कर्ज | ७८४११३ | ७११९१६ | ६६७१७१ | ६६९९९५ | ९४२५१७ | ४०५६५७ | ६१५१८४ | ४०१७०० | ४८४७१९ | ६७५९९१ |
| ०९. | नफा | .११९५८ | ७९०७८ | २७६३७ | ४२०२१ | ४९७०३ | ५२८५६ | २३२५० | ३४२७६ | ३७२४४ | ६३१५६ |
| १०. | शेतमाल पुरवठा | ४१९८८८ | ३२२२२६ | ७६८४२० | ५१६३९८ | ३३८७१५ | ४५४४८५, | ४६२३६८ | ४९६२२० | ५१९१८५ | ९२२७५५ |
| ११. | जीवनोपयोगी वस्तू | २३२७२५ | ७४८०८ | ८८८२१३ | १०३१५८३ | ४५९१२१ | ३८९२२१ | ३४२२९४ | ३१३५६८ | २६५८५० | ४६१४३५ |
| १२. | खेळते भांडवल | १३२८९७९ | १२०८४०३ | १२०२६३० | १५१६५८९ | १५४६१६९ | १०५७९५ | १०४२३६६ | ११५३४७५ | ११५०७५६ | १२०१६६१ |

आधार : संस्थेच्या कागदपत्रावरून

## कोष्टक क्रमांक ३.२५

## १९८१ ते १९९० मधील संस्थेच्या प्रगतीचा तक्ता

| अ. नं. | तपशील | १९८१ | १९८२ | १९८३ | १९८४ | १९८५ | १९८६ | १९८७ | १९८८ | १९८९ | १९९० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ |
| ०२. | सभासद संख्या | १०२० | ११३४ | ११४९ | १२४७ | १३०४ | १३३२ | १४२९ | १४६९ | १५०८ | १६३२ |
| ०३. | शेअर भांडवल | ३८९३०५ | ४२४१८० | ४५६३९५ | ४९४२७५ | ५३७७७० | ५८५४२५ | ६५०३९५ | ७८८३५५ | ८२२१३० | ८६७९१० |
| ०४. | सभासद ठेव | ३२६२३ | २२७१८ | १९६७० | २१६८० | २६५४० | २८१९५ | ३०२५५ | ३११८० | ३१३०५ | ५२५२७ |
| ०५. | बिगर सभासद ठेव | २१०२ | ११०२ | ११०२ | ११०२ | ११०२ | ११०२ | – | – | – | – |
| ०६. | कर्जवाटप | २४६६७० | ६५५०८१ | ९५९७९९ | ११६६५६६ | ११७१००० | १५०३२८६ | १२८९९८७ | १३२०५१९ | २००६३९६ | ११२५५८७ |
| ०७. | थकबाकी | ७१५६१ | ५१५९५ | ३५२४१ | ३००८८ | ४३९७२ | ७२०३६ | १०५५६६ | ११११९५ | १२३५९७ | ७३५८४ |
| ०८. | बँक कर्ज | ४५६२४२ | ४६५२५६ | ६४२८५८ | ११९६०५८ | ११५६९०० | १२८०२९६ | १२५६३६० | ११५०८८९ | १८१४७७२ | १०४९७३३ |
| ०९. | नफा | ५२९०० | ४४८५६ | ३८३५२ | ४०९४७ | २६१८० तोटा | ८४८७७ | १०९५०० | ६४६३४ | १२०८५१ | |
| १०. | शेत. पुरवठा | १०४२०३५ | १०९५००० | ७९६५६२ | ७७०८७५ | ११२१२५५ | ७९८३०० | | | | |
| ११. | डिव्हिडंड | ८टक्के | ६ टक्के | ६ टक्के | ६ टक्के | ६ टक्के | – | ९ टक्के | ९ टक्के | ७ टक्के | १० टक्के |
| १२. | जीवनावश्यक वस्तू | ६१५२३५ | ७०८६०० | ६०४३७५ | ७५२६७१ | ३३७९१२ | १०८१३५५ | – | – | – | – |
| १३. | खेळते भांडवल | १२४४७५८ | १४३८२४३ | १६९७४११ | १८८००७३ | २१३१९०० | २३०७७१९ | २८९६०६२ | २५००५३९ | १२०५१२३५ | ११३५८५०३ |

आधार : संस्थेची कागदपत्रे

## कोष्टक कुमांक ३.११

### १९६१ ते १९७० या कालावधी मधील संस्थेची प्रगती

| अ.नं. | तपशील | १९६१ | १९६२ | १९६३ | १९६४ | १९६५ | १९६६ | १९६७ | १९६८ | १९६९ | १९७० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ | अ |
| ०२. | सभासद संख्या | ५७६ | ६०४ | ६१४ | ६७८ | ७३३ | ७४८ | ७६० | ८०७ | ८२५ | ८१९ |
| ०३. | शेअर्स भांडवल | ५४९६५ | ६१६४५ | ७०७५५ | ८४२२० | १००३२५ | १०६२६५ | १२०९१० | १२९७१५ | १८६६५० | २२२५२५ |
| ०४. | सभासद ठेवी | ४२०५८ | ३३१२८ | ३२९९८ | ३२५१० | ४४१९३ | ४३२४३ | ३६६५३ | ३५८६८ | ६३००८ | ३९८९४ |
| ०५. | बिगरसभासद ठेवी | २३८१० | २७३०० | २७७१५ | ३३१०५ | ३०७७५ | ३३०८७ | ३८९६६ | २८११६ | ४०७८६ | २७२४१ |
| ०६. | कर्जवाटप | १२११६२ | १५१०२३ | १८१५८० | २३५३४५ | २७६५२३ | २७००२८ | ३५५३८६ | ४४९९७० | ९८३३८७ | ८३९७१० |
| ०७. | थकबाकी | – | – | – | – | – | २५०० | २५०० | – | – | १३५६८७ |
| ०८. | बँक कर्ज | – | – | ६२२५५ | ९४०८० | १०५०८७ | १२७३८८ | २३६३५१ | २८७२५७ | ६७८३६८ | ७४२७०२ |
| ०९. | रिफंड व इतर फंड | १७२२४ | २१७७२ | २५३५८ | ३१२८३ | ३६२४८ | ४५५८३ | ५९०३५ | ६८९७४ | ८९७१३ | – |
| १० | नफा | ५८०० | ४९५७ | ५६६८ | ५१०० | १३४८८ | १८७९८ | १४२१८ | १९४१७ | १८६८९ | २६६५८ |
| ११. | डिव्हिडंड | ४.०० | ४.०० | ४.२५ | ४.२५ | ६.२५ | ७.०० | ५.०० | – | ७.०० | – |
| १२. | शेत. पुरवठा | ४८०२१ | ५३८८७ | ८६६२४ | ११७८२१ | १३४८१४ | १५३८४६ | २०९५४२ | ३३७७७२ | ७९४७४३ | ३६१८१ |
| १३. | जीवनावश्यक वस्तू | ८८४२१ | ६७०७२ | ९२८४६ | १०६२४२ | १२४७०७ | १७८४६९ | १४७१५५ | १५८४०६ | २६८०२६ | १४१४६७ |
| १४. | येणे कर्ज | १०७६३५ | १२९५३५ | १६८७७६ | २१४७७८ | २५५७४५ | २३९००३ | २९८६३० | ३६७५३५ | ७२१६९६ | – |
| १५. | खेळते भांडवल | १५३९१२ | १७२१६४ | २३५३५१ | २९१२८३ | ३७०१३७ | ३८४५८६ | ५४०५१२ | ६४३२९२ | ११९८५६२ | १२३५२५६ |

आधार : संस्थेचे कागदपत्र

ऑडीट वर्ग -

या संस्थेच्या अहवालावरुन असे दिसून येते की, सातत्याने "अ" वर्ग मिळालेले आहे. या वर्गावरुन स्पष्टपणे असे दिसून येते की कोणत्याही प्रकारची चूक न करता सभासदाचे हीत डोळ्यासमोर ठेवून कार्य करीत आहे. लेखा परिक्षणाच्या अहवालानुसार ताळेबंद व नफा तोटापत्रके संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळते आहे असे दिसून येईल.

सभासद संख्या -

सभासदाच्या कल्याणासाठीच ही संस्था आहे याची कल्पना शेतक-यामध्ये दिसून येवू लागली, आणि त्यामुळे सर्वसाधारणपणे वर्षाला सभासदाच्या संख्येमध्ये २० ते ३० ने भर पडलेले आहे. १९६१ मध्ये ५७६ सभासद होते. १९७० पर्यंत ८११ पर्यंत वाढले.

शेअर्स भांडवल -

१९४८ मध्ये २२९५ रुपये भागभांडवल होते. त्यामध्ये वाढ होऊन १९६१ मध्ये ५४९५५ रुपये इतके झाले तर १९७० पर्यंत त्यामध्ये सर्वसाधारणपणे दुपटीपेक्षा जास्त वाढ होवून २२२५२५ रुपये इतके झाले

[कोष्टक क्रमांक ३.१२ पुढील पानावर]

**कोष्टक क्र. ३.१२**

१९६८ - ६९ मध्ये या संस्थेनी केलेली गुंतवणूक

| नांव | १९६६ | १९६९ |
|---|---|---|
| बँक शेअर्स | १५२५० | ४३५०० |
| शेतकरी सह.सा.कारखाना | ७५० | ७५० |
| मि.ता.प. भाग शेअर्स | २००० | २४२५ |
| तेलपेंड सोसायटी | ५०० | ५०० |
| साबण कारखाना शेअर्स | ५०० | ५०० |
| महाराष्ट्र सोसायटी | १०० | १०० |
| श्री गणपती संघ | १०० | १०० |
| नॅशनल सेव्हींग सर्टिफिकेट | २३०० | २८०० |
| औद्योगिक संघ | १० | १० |
| एकूण | २१५१० | ५०६८५ |

वरील कोष्टक क्रमांक ३.११ मध्ये या संस्थेनी इतर संस्थेमध्ये केलेली गुंतवणूक १९६६ मध्ये २१५१० रुपये होती. त्यामध्ये २९,१७५ रुपयांनी वाढ होऊन ५०६८५ रुपये झाली. केलेली गुंतवणूक ही दीडपट इतके अधिक आहे.

**ठेवी -**

ही संस्था स्थापनेपासून ठेवी गोळा करीत आहे. सुरवातीला ठेवीवरुनच शेतक-यांना कर्ज दिले जात होते. ही संस्था पुर्णपणे स्वावलंबी

होती.

**कोष्टक क्रमांक ३.१३**

१९६१ ते १९७० मधील संस्थेची ठेवी

| सन | ठेवी |
|---|---|
| १९६१ | ४२०५८ |
| १९६३ | ३२९८८ |
| १९६५ | ४४१९३ |
| १९६७ | ३६६५३ |
| १९६९ | ६३०७८ |

**आधार** - संस्थेची कागदपत्रे

वरील कोष्टक क्रमांक ३.१२ वरून सभासदांच्या ठेवी गोळा करून त्या ठेवीचे रूपांतर सभासदांना कर्जपुरवठा करण्यासाठी केला जात होता. संस्थेच्या ठेवीमध्ये या कालावधीमध्ये नेहमी चढउतार होत आहे.

सभासदाच्या ठेवीबरोबर बिगर सभासदाच्या ठेवीचे योगदान या संस्थेला मिळालेले आहे. कोष्टक क्रमांक ३.११ वरून सन १९६१ मध्ये २३६१० रूपये ठेव होती, तर त्यात १९७० पर्यंत त्यामध्ये ४०११ रूपयांनी भर पडून २७६२१ रूपये इतकी झाली.

कर्जवाटप -

ही संस्था सभासद शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करीत असताना साधे कर्ज, मध्यम मुदत कर्ज इतर व तारणावरील कर्ज असे प्रकार पाडून कर्ज पुरवठा केला जातो.

साधे कर्ज -

यामध्ये विशेषत: रासायनिक खते, पेंड पावडर, मिश्र खते,मासळी स्फोटिन, क्रुडाईल, स्प्रे पंप इत्यादी शेतीउपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी कर्ज दिले जाते. ६½% व्याज दराने दिला जात होता.

मध्यम मुदत कर्ज -

मध्यम मुदत कर्जप्रकार हा संस्थेमध्ये सन १९६४ मध्ये प्रथमत: सुरुवात करावी लागली. उदा. म्हैस, गाई खरेदीसाठी दिला जातो.

तारण कर्ज -

यामध्ये शेतमालाच्या तारणावर कर्ज दिला जातो. तर इतर कर्जामध्ये शेतक-यांना गोठा बांधण्यासाठी कर्ज दिला जातो.

**कोष्टक क्रमांक ३.१४**
**कर्जवाटपाबाबत**

| सन | साधे कर्ज [रुपयामध्ये] | म.मुदत कर्ज [रुपयामध्ये] | इतर व तारण कर्ज [रुपयामध्ये] | एकूण कर्ज [रुपयामध्ये] |
|---|---|---|---|---|
| १९६२ | १५१२९५ | - | १७३८१ | १६८६७६ |
| १९६४ | २०६०८० | ९०० | ७५९३ | २१४५७ |
| १९६६ | ९८६६४ | १०७०० | १३६७६ | १२३०४० |
| १९६८ | २३११२८ | ३१८५१ | २४२७६ | २८७२५५ |

**आधार** : [ संस्थेच्या वार्षिक ताळेबंदावरुन ]

वरील कोष्टकावरुन असे सांगता येईल की, साधे कर्जप्रकारात अल्पप्रमाणामध्ये वाढ होत आहे. तसेच संस्थेनी मध्यम मुदतीचे कर्ज प्रथमच १९६४ मध्ये ९०० रुपयाचे दिलेले होते. त्यामध्ये १९६६ मध्ये वाढ होवून

१०७०० रुपये झाले. तर १९६८ मध्ये तीनपट वाढ होऊन ३१८५१ रु. इतके वाटप झाले.

नफा –

१९६१ ते १९७० या दहा वर्षांच्या कालावधीमधील कोष्टक क्र. ३.११ पाहिले तर नफा मिळविण्याचा प्रयत्न केलेला नाही. या संस्थेला १९६१ मध्ये कर्जावरील व्याज, शेतमाल वस्तू पुरवठा, औषधे जिवनउपयोगी वस्तूंचा पुरवठा करुन फक्त ५८०० रुपये नफा मिळविला होता. त्याचे प्रमाण वाढून १९७० मध्ये २६६५८ रुपये इतके झाले. या वाढीचे कारण म्हणजे, कर्जवाटपामध्ये वाढ, मध्यम मुदत कर्जपुरवठ्याचा अवलंब इत्यादी गोष्टी सांगाव्या लागतील.

शेतमाल पुरवठा –

शेतकऱ्यांना कर्ज दिले जात असताना त्यातील ६०% भाग हे वस्तूरुपाने दिला जातो. शेतकऱ्यांना जर कर्ज रोख स्वरुपात दिले गेले तर शेतकरी अनुत्पादक कारणासाठी खर्च करेल, म्हणून सोसायटीमधूनच शेतमाल पुरवठा केला जात होता. त्यामध्ये रासायनिक खते, मासळी खते, किटकनाशक औषधे, तसेच शेती अवजारे इत्यादी वस्तूंचा पुरवठा केला गेला.

**कोष्टक क्रमांक ३.१५**

**शेतमाल पुरवठाबाबत**

| सन | शेतीमाल पुरवठा [रक्कम] [रुपयेमध्ये] |
|---|---|
| १९६२ | ५३८८७ |
| १९६४ | ११७८२१ |
| १९६६ | १५३८४६ |
| १९६८ | ३३७७७२ |
| १९७० | ३६१८११ |

**आधार :-** संस्थेचे कागदपत्र

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, पहिल्या दोन वर्षामध्ये ६३९३४ रुपयांनी वाढ होऊन ११७८२१ रुपये इतकी झाली तर १९७०मध्ये ३०७९२४ रुपयांनी वाढ होवून ३६१८११ रुपये झाली म्हणजे शेतीमाल पुरवठा वाढ हा ६ पटीपेक्षा जास्त होता.

जिवनापयोगी वस्तू -

१९६२ मध्ये दोन स्वस्त धान्य सेंटर उघडून नियंत्रीत व घरगुती माल स्वस्त दराने पुरवठा करण्याचे काम या संस्थेनी केलेली आहे. त्यामध्ये चहा, गुळ, मीठ, रॉकेल, कापड, गहू, तांदूळ, साखर, तेल इत्यादी वस्तूंचा पुरवठा करीत होता.

बॅंक **कर्ज** -

सन १९६३ मध्ये संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच कर्जपुरवठा करण्यासाठी बॅंकाकडून कर्ज घेतले.

**कोष्टक क्रमांक ३.१६**

| सन | बॅंक कर्ज |
|---|---|
| १९६३ | ६२२५५ |
| १९६५ | १०५०८७ |
| १९६७ | २३६३५१ |
| १९६९ | ६३८३६८ |

**आधार :-** वार्षिक ताळेबंद अहवाल

१९६७ मध्ये सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून २६१२४४ रुपयाचे कर्ज घेतलेले होते. त्याचे वाटपही संस्था पुढीलप्रमाणे केले.

**कोष्टक क्रमांक ३.१७**

| कर्जकारण | रुपयामध्ये |
|---|---|
| बँक साधे कर्ज | १,९९,६२९ |
| बँक ज्वारी कर्ज | १०,००५ |
| बँक हायब्रिड कर्ज | ३९,८९० |
| म्हैस मध्यम मुदत कर्ज | १०,००० |
| विहीर दुरुस्ती म.म. कर्ज | १,००० |
| जमिन दुरुस्ती म.म. कर्ज | ७०० |
| रुपये | २,६१,२२४ |

**आधार :-** वार्षिक ताळेबंदावरुन

१९६७ मध्ये २६१२२४ रुपये बँकाकडून कर्ज घेवून बाकीचे ९४१६२ रु. संस्थेच्या भांडवलातून वाटप केले.

<u>खेळते भांडवल</u> -


**कोष्टक क्र. ३.१८**

| सन | भांडवल [रुपयामध्ये] |
|---|---|
| १९६१ | १५३९१२ |
| १९६५ | ३७०१३७ |
| १९७० | १२३५२५६ |

पहिल्या ५ वर्षामध्ये खेळते भांडवलाचे प्रमाण दुपटीपेक्षा जास्त झाले तर, पुढील ५ वर्षामध्ये हे प्रमाण तीन पटीपेक्षा जास्त झाले म्हणजे खेळते भांडवलाचे प्रमाण हे वाढतच आहे.

१९६१ ते १९७० पर्यंत संस्थेच्या प्रगतीचा अभ्यास करीत असताना १९६६ मध्ये संस्थेचा सुवर्ण महोत्सव साजरा केला गेला. त्यावेळी संस्थेच्या इमारत बांधकाम व दोन गुदामगृहही बांधण्यात आले.

**१९६१-७० मध्ये सोसायटीने हाती घेतलेली कामे**





आधार :- १९६१ ते १९७० वार्षिक अहवालानुसार

## ३.२४ १९७१ ते १९८० या कालावधीमधील संस्थेची प्रगती :-

या दहा वर्षामधील कालावधीतील संस्थेची प्रगतीची वाटचाल वार्षिक ताळेबंद अहवालावरुन सांगता येईल.

[ कोष्टक क्र. ३.१९ पुढील पानावर ]

सन १९७२ ते १९८० कालावधीतील शेअर भांडवलबाबतचे स्तंभ आलेख




१] ऑडीट वर्ग -

या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये या संस्थेची लेखापरिक्षणानुसार पाहणी केल्यानंतर ऑडीट रिपोर्टवरुन "अ" हा वर्ग देण्यात आलेला आहे. यावरुन संस्थेच्या ताळेबंदाविषयी असे म्हणता येईल की, संस्थेची प्रगती करीत असताना नफा तोटा पत्रकात कोणत्याही त्रुटी ठेवल्या नाहीत.

२] सभासद संख्या -

को. क्रमांक ३.१९ नुसार सभासदाच्या संख्येत वाढ झालेली आहे. १९७१ मध्ये एकूण सभासदांची संख्या ८४३ होती त्यामध्ये १६२ नी वाढ होवून १००५ झाली.

शेअर भांडवल -

वरील को.क्रमांक ३.१९ वरुन शेअर भांडवलात दहा वर्षाच्या कालावधीमध्ये ११०५१० रुपयांनी वाढ झाली. परंतु १९७३ मध्ये १९७२ च्या मानाने १६४२५ रुपयांनी घट झालेली आहे.


सभासद ठेव :-

**कोष्टक क्रमांक ३.२०**

| सन | ठेव [रुपयामध्ये] |
|---|---|
| १९७२ | २०३७३ |
| १९७४ | २६३९८ |
| १९७६ | २४७०३ |
| १९७८ | ३७९९८ |
| १९८० | ४०५८४ |

**आधार** : वार्षिक ताळेबंदपत्रक

**सभासद ठेव स्तंभ आलेख**




वरील कोष्टक क्रमांक ३.२० वरुन आणि स्तंभ आलेखावरुन असे म्हणता येईल की, अल्प व मध्यम मुदतीच्या ठेवीमध्ये काही वेळा वाढ झालेली आहे तर काही वेळा घट झालेली आहे. संस्थेच्या मानाने ठेवीचे प्रमाण फारच कमी आहे.

**कर्जवाटप :**

**कोष्टक क्रमांक ३.२१**

| सन | शेअर भांडवल [रुपयात] | बँक कर्ज [रुपयात] | कर्ज वाटप [रुपयात] |
|---|---|---|---|
| १९७२ | २,७३,२३५.०० | ७,११,९१६.०० | १३,७८,७७६.०० |
| १९७६ | ३,१०,२५०.०० | ४,०५,६५७.०० | ४,४६,३२४.०० |
| १९८० | ३,६७,४१५.०० | ६,७५,९३१.०० | ६,४१,४२१.०० |

आधार : संस्थेची कागदपत्रे

वरील कोष्टक क्रमांक ३.२१ वरुन शेअर भांडवलात वाढ होत असताना बँकांकडून घेण्यात आलेले कर्जप्रमाण कमी होत आहे. त्यामुळे कर्जवाटपाचे प्रमाणही कमी होत आहे. बँकांकडून घेतलेल्या कर्जाचे प्रमाण वाढले तरच कर्जवाटपाचे प्रमाण वाढते. १९७२ मध्ये बँक कर्ज ७११९१६रुपये होते. त्याचे प्रमाण कमी होवून १९८० मध्ये ६७५९३१ रुपये इतके झाले. त्यामुळे कर्जवाटपाचे प्रमाणही कमी झाले.

**नफा :**

कोष्टक क्रमांक ३.१९ वरुन सन १९७१-७२ या दोन वर्षामध्ये संस्थेला तोटा झालेला होता. मात्र १९७३ ते १९८० पर्यन्त ६३१५६/- रु. इतका नफा झालेला आहे.

**शेती आवश्यक वस्तूंचा पुरवठा :**

पीक कर्ज रक्कमेतून काही टक्के भाग वस्तूस्वरूपात शेतीला लागणा-या वस्तूंचा पुरवठा केला जातो. पुढील कोष्टकावरून शेतमाल पुरवठ्याची माहिती समजू शकेल.

**कोष्टक क्रमांक ३.२२**

| सन | शेती आवश्यक वस्तू |
|---|---|
| १९७२ | ३,२२,२२६ |
| १९७४ | ५,१६,२९८ |
| १९७६ | ४,५४,४८५ |
| १९७८ | ४,९६,२२० |
| १९८० | ९,२२,७५५ |

आधार : संस्थेची कागदपत्रके

कोष्टक क्रमांक ३.२२ वरून असे सांगता येईल की या संस्थेकडून शेती आवश्यक वस्तूंचा पुरवठा करण्याचे प्रमाण हे वाढत आहे. १९७२ च्या मानाने १९८० मध्ये ६,००,५२९ रुपयांनी वाढ झालेली आहे. सर्व-साधारणपणे दुप्पट शेतमाल पुरवठा वाढलेला आहे.

**जीवनावश्यक वस्तू :**

संस्थेमार्फत धान्यसेंटर व कापड सेंटर या दोन्हीच्या सहाय्याने सभासदांना स्वस्त, सुबक व भरपूर जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा केला जातो. जीवनोपयोगी वस्तूंमध्ये प्रत्येक वॉर्डात एका धान्य सेंटरची

स्थापना केलेली आहे. या सेंटर्स मधून गहू, तांदूळ, साखर, तेल, ज्वारी बाजरी, इत्यादी वस्तूंचा पुरवठा केला जातो.

**कापड सेंटर :**

शेतकरी सभासद व सभासदांच्या मुलांना आवश्यक असणा-या कापडाचाही पुरवठा केला जातो.

जीवनोपयोगी वस्तूंच्या पुरवठ्याबाबत कोष्टक

**कोष्टक क्रमांक ३.२३**

| सन | जीवनावश्यक वस्तू [रुपयात] |
|---|---|
| १९७२ | ७४,८०८ |
| १९७४ | १०,३१,५८३ |
| १९७६ | ३,८९,२२१ |
| १९७८ | ३,३१,५६८ |
| १९८० | ४,६१,४३५ |

आधार : संस्थेचे कागदपत्रांवरून

कोष्टक क्रमांक ३.२३ वरून असे निष्कर्ष काढता येतील की सभासदांकडून दहा वर्षांमध्ये ४ पटीने वाढ झालेली आहे.

कोष्टक क्र. ३.२४
पुढील पानावर

**खेळते भांडवल :**

**कोष्टक क्रमांक ३.२४**

| सन | खेळते भांडवल [रुपयात] | वाढीचे प्रमाण [रुपयात] | घटीचे प्रमाण [रुपयात] |
|---|---|---|---|
| १९७१ | १३२८९७९.०० | - | - |
| १९७४ | १५२६५८९.०० | १,९७,६१० | - |
| १९७८ | ११२५४७५.०० | - | ४०१११४ |
| १९८० | १२०१६६१.०० | ७६,१८६ | - |

**आधार : संस्थेचे कागदपत्रांवरुन**

१९७१ च्या प्रमाणाने खेळत्या भांडवलात १९७४मध्ये १९७६१०वाढ झालीआहे.

१९७४ च्या प्रमाणाने खेळत्या भांडवलात १९७८ मध्ये ४०१११४ रुपयांची घट झाली आहे.

१९७८ च्या प्रमाणाने खेळत्या भांडवलात १९८० मध्ये ७६१८६ ने वाढ झालेली आहे.

१९८१ ते १९९४ या कालावधीमधील या संस्थेच्या विविध कार्यावलोकनाची पहाणी केल्यानंतर पुढील प्रमाणे संकल्पना मांडता येईल. या संस्थेच्या प्रत्येक वर्षिक अहवालावरून विकासात्मक कार्याची माहिती देता येईल.

१९६१ ते १९९१ या कालावधीमध्ये नांद्रे गावच्या लोकसंख्येत सातत्यानी वाढ झालेली आहे. १९९१ मध्ये नांद्रे गावची लोकसंख्या १००४६ इतकी होती.

सन १९९२-९३ मध्ये गावाचे भौगोलिक क्षेत्र२७७४.६२ हेक्टर इतके आहे. यावरून नांद्रे गावचा भौगोलिक क्षेत्राचा आकार मोठा आहे असे म्हणता येईल.

या लोकसंख्येच्या दृष्टीने या विविध कार्यकारी सहकारी सोसायटीमधील सभासद संख्येचे प्रमाण पाहिले पाहिजे.

**सभासद संख्या :** कोष्टक क्र. 3.26

| वर्ष | सभासद | वाढीची संख्या |
|---|---|---|
| १९८० | १००५ | - |
| १९८२ | ११३४ | १२९ |
| १९८४ | १२४७ | ११३ |
| १९८६ | १३३२ | ८५ |
| १९८८ | १४६९ | १३७ |
| १९९० | १६३२ | १६३ |
| १९९२ | १६७४ | ४२ |
| १९९३ | १७७२ | ९८ |

आधार : संस्थेची कागदपत्रे

गावच्या लोकसंख्येच्या वाढीबरोबर संस्थेच्या सभासद संख्येत वाढ झालेली आहे. कोष्टक क्रमांक ३.२५ वरुन असे दिसून येते की वाढीचे प्रमाण सर्वसाधारणपणे दोन वर्षांच्या कालावधीमध्ये १०० ने किंवा त्याहीपेक्षा जास्त संख्येत वाढ झालेली आहे.

१९९० मध्ये संस्थेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून विकास पाणी पुरवठा संस्थेला अर्थसहाय्य दिलेले आहे. त्यामुळे सभासद संख्येत वाढ झालेली आहे.

**भाग भांडवल :**

१९१६ मध्ये या संस्थेची स्थापना झालेली आहे. त्यावेळी सुरवातीला अंदाजे ३५० रुपये इतके भांडवल सभासदांकडून घेवून या संस्थेची स्थापना झालेली होती. जवळजवळ ७५ वर्षांच्या कालावधीमध्ये सभासदांकडून मिळालेल्या भाग भांडवलाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास १९८१ ते ९३ या कालावधीमधील संस्थेच्या भांडवलाविषयी माहिती पुढीलप्रमाणे मांडता येईल.

**कोष्टक क्रमांक ३.२७**

| वर्ष | भांडवल [ शेअर्स ] |
|---|---|
| १९८१ | ३,८९,३०५ |
| १९८३ | ४,५६,३९५ |
| १९८५ | ५,३७,७७० |
| १९८७ | ६,५०,३९५ |
| १९८९ | ८,३२,१३० |
| १९९१ | ८,६७,९४० |
| १९९३[१० महिने] | १०,७८,६७० |

आधार : संस्थेची कागदपत्रे

वरील कोष्टक क्रमांक ३.२६ वरुन संस्थेच्या भाग [शेअर्स] रुपाने झालेल्या वाढीचा विकास लक्षात येवू शकेल.

सर्वसाधारणपणे सभासदांच्या घेतलेल्या कर्जातून ५ टक्के रक्कम व्यक्तींच्या शअर्स रुपाने जमा केली जाते. त्यामुळे १९८१ मध्ये ३८९३०५ रुपये इतके भांडवल होते. १९९३ पर्यन्त १०७८६७० रुपये इतके झाले. म्हणजेच या कालावधीमध्ये संस्थेच्या भांडवलामध्ये ३ पट वाढ झालेली आहे.

**ठेवी :**

संस्थेच्या विकासाची कल्पना संस्थेच्या भाग भांडवला वरुन लक्षात येते. त्याचप्रमाणे सभासद व बिगर सभासदांकडून मिळालेल्या ठेवींवरुनही करता येते. ही संस्था सभासद मुदत ठेव, सभासद बचत ठेव आणि बिगरसभासद मुदत ठेव अशा प्रकारच्या ठेवी गोळा करते.

**कोष्टक क्रमांक ३.२८**

| सन | सभासद मुदतठेव [रुपयात] | सभासद बचतठेव [रुपयात] | बिगरसभासद मुदतठेव [रुपयात] |
|---|---|---|---|
| १९८१ | - | - | - |
| १९८३ | ४,८०५ | १४,७९५ | १,१०२ |
| १९८५ | ४०० | २१,२८० | १,१०२ |
| १९८७ | - | ३०,२५० | - |
| १९८९ | - | ३१,९८० | - |
| १९९१ | - | ५१,०२५ | १,५०२ |
| १९९३ | - | २३,२८५ | - |

आधार : संस्थेची कागदपत्रे

वरील कोष्टकावरून १९८३ ते १९८९ हा कालावधी वगळता, सभासद मुदत ठेव ठेव ठेवत नाही असे दिसून येते.

सभासदांनी बचत ठेवीमध्ये जी काही गुंतवणूक केलेली आहे त्याचे प्रमाणही फारच कमी आहे.

सभासद सोडून इतर व्यक्तींच्याकडून घेतलेल्या ठेवींचे प्रमाणही फारच अल्प आहे.

**सभासद कर्ज :**

सहकारी संस्था व सभासदांना कर्ज हे एक समीकरण बनलेले आहे. त्याचप्रमाणे सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जामध्ये प्रामुख्याने तीन प्रकार आहेत. १] अल्पमुदत कर्ज, २] मध्यममुदत कर्ज व ३] दीर्घ मुदत कर्ज.

अल्पमुदत कर्ज :

अल्पमुदत कर्जामध्ये साधे कमकुवत व साधे सधन कर्ज असे प्रकार पाडलेले आहे.

**कोष्टक क्रमांक ३.२९**

| सन | साधे सधन कर्ज [रूपयात] | साधे कमकुवत कर्ज [रूपयांत] |
|---|---|---|
| १९८१ | – | – |
| १९८३ | १३,३५१ | १६,७७४ |
| १९८५ | २९,१०६ | २०,८९१ |
| १९८७ | – | ७,६२४ |
| १९८९ | २८,५६९ | – |
| १९९१ | २६,२६५ | १३,६७१ |
| १९९३ | ८,८२३ | ५४,५७३ |

आधार : संस्थेची कागदपत्रे

**साधे सधन कर्ज :**

ज्यांची शेती ५ एकर किंवा त्यापेक्षा जास्त असणा-या शेतक-यांना देण्यात येणारा हा कर्ज प्रकार होय. या शेतामध्ये जिराईत पीके घेतली जातात.

**साधे कमकुवत कर्ज :**

ज्यांची शेती ५ एकरापेक्षा कमी आहे त्या शेतक-यांना दिला जाणारा हा कर्ज प्रकार होय. त्या शेतक-यांच्या शेतामध्ये ज्वारी, बाजरी, मुग, तूर इत्यादी पीके घेतली जातात.

कोष्टक क्रमांक ३.२८ मध्ये साध्या सधन कर्जामध्ये घट झालेली आहे तर, साध्या कमकुवत कर्जामध्ये वाढ झालेली आहे.

**ऊस कर्ज प्रकार :**

**कोष्टक क्रमांक ३.३०**

| सन | ऊस सधन कर्ज [रुपयात] | ऊस कमकुवत कर्ज [रुपयात] |
|---|---|---|
| १९८३ | १९३७५४ | २१८७६५ |
| १९८६ | ३२०८६० | ४८६८८२ |
| १९८९ | २१४८५८ | ३५७७७६ |
| १९९२ | ५७९८७२ | ८४५१३३ |

वरील कोष्टकामध्ये ऊसकमकुवत कर्ज प्रकारात ४ पटीने वाढ झालेली दिसत आहे. तर ऊस सधन कर्ज प्रकारामध्ये २ पटीपेक्षा जास्त वाढ झालेली आहे.

**सभासद मध्यममुदत कर्ज :**

**कोष्टक क्रमांक ३.३१**

| सन | ३ वर्षा करिता [रुपयात] | ५ वर्षा करितात [रुपयात] | ६७ वर्षा करिता [रुपयात] |
|---|---|---|---|
| १९८१ | - | - | - |
| १९८३ | ४२,२५४ | ६३,१७२ | - |
| १९८५ | ४४,९३१ | ९१,४६६ | ६,५९२ |
| १९८७ | ४२,९९८ | ११,०६,०५५ | २,५७९ |
| १९८९ | २५,०५२ | ३,३२,७३७ | २,५७९ |
| १९९१ | - | ३,५०,११४ | १०९९५ |
| १९९३ | २,८०० | ३९,१५,९०५ | ५६,९९२ |

**आधार : संस्थेची कागदपत्रे**

वरील कोष्टकक्रमांक ३.३१ वरुन असे म्हणता येईल की ३ वर्षे मुदती करीता म्हणजे म्हैस, गाय खरेदी साठी देण्यात आलेल्या कर्जामध्ये घट झालेली आहे.

५ वर्षेमुदतीकरिता म्हणजेच पाणी पुरवठा, साधन निर्मिती व दुरुस्ती करिता देण्यात येणा-या कर्ज प्रकारामध्ये वाढ झालेली आहे. १९८३ मध्ये ६३१७२ रुपये इतकी होती त्यात १९९३ मध्ये ३९१५९०५ रुपयांनी वाढ झालेली आहे. कारण १९९२ मध्ये शेतकरी उपसा जल सिंचन योजना नं. २ या संस्थने २५ लाख रुपये कर्ज घेतलेले आहे.

७ वर्षाकरिता देण्यात आलेल्या कर्जामध्येही वाढ झालेली आहे. त्याचे प्रमाण फारच अल्प आहे.

**सभासद दीर्घमुदत कर्ज :**

**कोष्टक क्रमांक ३.३२**

| सन | दीर्घमुदत कर्ज [ रुपयामध्ये ] |
|---|---|
| १९८१ | -- |
| १९८३ | -- |
| १९८५ | -- |
| १९८७ | -- |
| १९८९ | -- |
| १९९१ | ७४,५९,५७२ |
| १९९३ | १,२९,४४,१९५ |

आधार : संस्थेची कागदपत्रे

वरील कोष्टकक्रमांक ३.३२ वरुन दीर्घ मुदतीच्या म्हणजे १२ वर्षाच्या कालावधीसाठी या संस्थेने १९९१ मध्ये ७४,५९,५७२ रुपयांचे कर्ज वाटप केलेले आहे. संस्थेने जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून अर्थ सहाय्य घेऊन विकास पाणी पुरवठा संस्थेला १५ टक्के व्याजदराने कर्ज दिलेले आहे. त्याचे प्रमाण वाढून १९९३ मध्ये १,२९,४४,१९५ रुपयांचे कर्ज पुरविले आहे.

**शेती आवश्यक वस्तूंचा पुरवठा :**

सर्व सेवा देणारी नाद्रे मधील एकमेव संस्था म्हणून नाद्रे विविध कार्यकारी संस्था ओळखली जाते. शेतक-यांना शेती उत्पादन वाढविण्यासाठी शेती उत्पादन साधनांचा पुरवठाही केला जातो. यामध्ये खत विभाग हा महत्वाचा विभाग आहे.

अ] खत विभाग :

शेती उत्पादनासाठी नत्र, पालाश, व स्फुरद या खताचा पुरवठाही या विभागामार्फत केला जातो. यासाठी १९८३ ते १९९३ या कालावधीमधील खत पुरवठा वाढीचे कोष्टक पुढीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ३.३३

| सन | खत [रुपयात] |
|---|---|
| १९८३ | ७,६१,६८५ |
| १९८६ | ७,६८,८५२ |
| १९८९ | ४,४४,५२३ |
| १९९१ | २,५२,५५५ |
| १९९३ | २,५१,८७७ |

आधार : संस्थेची कागदपत्रे

वरील कोष्टकावरुन असे सांगता येईलकी १९८३ मध्ये ७६१६८५ रुपयांची विक्री झाली होती. परंतू १९९३ मध्ये त्यात फार घट झालेली आहे. ती १९९३ मध्ये २५१८७७ रुपये इतकी झाली.

ब] बियाणे विक्री विभाग :

१९८३ ते १९९३ या कालावधी मधील शेतक-यांना देण्यात आलेली बी बीयाणे पुढीलप्रमाणे : ज्वारी, हायब्रीड, शेंग.

**कोष्टक क्रमांक ३.३४**

| सन | बियाणे विक्री [रुपयात |
|---|---|
| १९८३ | १२,८७६ |
| १९८५ | २५,७२४ |
| १९८७ | ६,५४७ |
| १९८९ | ७२३ |
| १९९१ | - |
| १९९३ | - |

आधार : संस्थेचे कागदपत्र

वरील कोष्टकावरुन या संस्थेकडून बियाणे विक्रीचे प्रमाण हे घटलेले आहे. १९८३ मध्ये १२८७६ रुपये इतकी बियाणे विक्री झाली होती. १९८९ मध्ये फक्त ७२३ रुपयांची विक्री केलेली आहे. त्यानंतर मात्र हा विभाग बंद पाडला गेलेला आहे.

**जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा :**

अ] **रॉकेल :**

सभासद कार्ड धारकांना रॉकेल स्वस्त व मुबलक प्रमाणात मिळावे यासाठी संस्थेकडून रेशन कार्डावर रॉकेल पुरवठा केला जातो.

सरासरी मासिक एका कार्डावर प्रति ५ लिटर याप्रमाणे वाटप केले जाते. रॉकेल विक्रीही रॉकेल पुरवठ्यावर अवलंबून असते. एखाद्या वर्षी रॉकेल पुरवठा कमी झाला तर रॉकेल विक्रीचे प्रमाणही कमी होते. मात्र रॉकेलची मागणी मात्र कधीही कमी झालेली नाही.

**कोष्टक क्रमांक ३.३७**

| वर्ष | रॉकेल विक्री [रूपयात] | वाढीचे प्रमाण [रूपयात] |
|---|---|---|
| १९८३ | ८,२०३ | - |
| १९८५ | १,६६,७८२ | १,५८,५७९ |
| १९८७ | १,९०,४१० | २३,६२८ |
| १९८९ | १,८९,८०२ | ६०८ [कमी] |
| १९९१ | ३,२५,६९३ | १,३५,८९१ |
| १९९३ | १,८९,७७० | १,३५,९२३ [कमी] |

आधार : संस्थेची कागदपत्रे

ब] **कापड विभाग** :

संस्थेकडून इतर विभागाप्रमाणे सभासद व बिगर सभासदांना योग्य नामवंत कंपनीच्या गिरणीतून कापड खरेदी करून त्याची विक्री केली जाते.

**१९८५ ते १९९३ अखेर पर्यंतचे कापड खरेदी व विक्रीचे कोष्टक**

**कोष्टक क्रमांक ३.३८**

| वर्ष | खरेदी [रूपयात] | विक्री [रूपयात] |
|---|---|---|
| १९८५ | ७२३७६ | ९८८५७ |
| १९८७ | १०६४५० | १११०५६ |
| १९८९ | ७७९९६६ | ५५८२२२ |
| १९९१ | ६६७६८४ | ७४०५०९ |
| १९९३ | ५९५१५२ | ५८८४९३ |

आधार - संस्थेचे कागदपत्रक

कोष्टक क्रमांक ३.३५ वरील १९८५ पासून कापड खरेदी - विक्री प्रमाणात वाढ झालेली आहे. १९८५ मध्ये फक्त ९८८५७ रुपयाची विक्री झालेली होती. तर १९९३ अखेर पर्यंत ५८८४९३ रुपयाची विक्री झालेली आहे.

क] <u>धान्य विभाग</u> :

या संस्थेकडून दोन धान्य सेंटर दुकान सुरु करण्यात आलेली आहे. या धान्य विभागामध्ये गहू, साखर, तांदूळ, ज्वारी, तेल इत्यादी वस्तूंचा पुरवठा केला जातो.

साखर माणसी ४०० ग्रॅम व गहू व तांदूळ एका कार्डामागे ५ ते ७ किलो या प्रमाणात वाटप केले जाते.

सन १९८५ ते १९९३ पर्यंत धान्य विभागाकडून केलेल्या खरेदी विक्रीचे प्रमाण पुढील कोष्टकामध्ये मांडलेले आहे.

कोष्टक क्रमांक ३.३७

**१९८५ ते १९९३ मधील धान्य खरेदी - विक्रीचे प्रमाण**

| सन | खरेदी [लाखात] | विक्री [लाखात] | नफा [लाखात] |
|---|---|---|---|
| १९८५ | ६९७०८४ | ६९७९४७ | ४३६ |
| १९८७ | ९८४८१३ | १०३५६९ | ४६४० |
| १९८९ | ९६७८७७ | १०१०८०५ | १९२७ |
| १९९१ | १०७०६०२ | ११२५९३९ | ३०३७ |
| १९९३ | ६०६३१० | ६४४०६५ | ११५९ |

[ आधार : संस्थेचे कागदपत्रक ]

कोष्टक क्रमांक ३.३७ मध्ये धान्य विभागामधील खरेदी विक्री व नफ्याचे प्रमाण दाखवण्यात आलेले आहे. यामध्ये नफा घेण्यशचे प्रमाण फारच अल्प आहे. १९९१ मध्ये मात्र धान्य विक्रीचे प्रमाण कमी झालेले आहे. १९९१ पेक्षा १९९३ मध्ये ४६४२९२ रुपयांनी खरेदी कमी झालेली आहे. तर विक्रीचे प्रमाण ४८०८६६ रुपयांनी कमी झालेले आहे.

**<u>सिमेंट विभाग</u> :**

या संस्थेकडून धान्य, रॉकेल, कापड या विभागाप्रमाणेच [संस्थेला नफा व्हावा या उद्देशाने] बागलकोट, ॲ.सी.सी., एल्.टी. इत्यादी नामवंत कंपनीचे सिमेंट विक्रीही केली जाते. १९८९ मध्ये सिमेंट विभाग सुरु केलेला आहे.

**१९८९ ते १९९३ मधील सिमेंट खरेदी-विक्री व नफा कोष्टक**

**कोष्टक क्रमांक ३.३८**

| वर्ष | खरेदी [लाखात] | विक्री [लाखात] | निव्वळ नफा [हजार] |
|---|---|---|---|
| १९८९ | २,३४,२२० | २,३६,६३८ | ३,०३५ |
| १९९१ | २,४४,६६० | २,१९,७७३ | ६२९ |
| १९९३ | ३२,४०,८०१ | ३,३१,४३७ | १,२९१ |

आधार : संस्थेची कागदपत्रे

संस्थेने केलेल्या सिमेंट पुरवठा आणि त्या पुरवठ्याच्या मानाने मिळालेला नफा हा फारच अल्प आहे.

**नफा :**

या संस्थेने पतपुरवठ्याशिवाय विविध सेवांचा पुरवठा करण्याचा प्रयत्न करीत आहे. संस्थेची स्थापना ही 'ना नफा ना तोटा' या समिकरणानुसार केली जात असताना, संस्थेला काही विशिष्ठ गोष्टी पूर्ण कराव्या लागतात.

यामध्ये गोडावून बांधकाम, इमारत बांधकाम, नोकर पगार, कार्यालयीन खर्च, तसेच सभासदांच्या भाग भांडवलावर दिला जाणारा लाभांश इत्यादी गोष्टी चा समावेश आहे. यासाठी संस्थेला विविध विभागाकडून नफा मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे. लागतो.

१९८३ ते १९९३ या कालावधीमध्ये संस्थेला मिळालेला नफा पुढील कोष्टकातून सांगता येईल.

कोष्टक क्रमांक ३.३९ पुढील पानावर

## १९८३ ते १९९३ मध्ये संस्थेला मिळालेला नफा

### कोष्टक क्रमांक ३.३९

| वर्ष | रॉकेल [रुपया] | सिमेंट [रुपया] | कापड [रुपया] | धान्य [रुपया] | मुख्यऑफिस [रुपया] | खत [रुपया | एकूण नफा [रुपया] |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८३ | - | - | ४७ | १००६ | ३६,२७५ | ९२३ | ३८,२५२ |
| १९८५ | १०७ | - | ५० | ४३६ | ३८,७४४ | १,६०८ | ४०,९४५ |
| १९८७ | ६२९ | - | १,२६८ | ५६३० | ६५,२२६ | ३,८७० | ७६,६२३ |
| १९८९ | ३७६ | ३०३५ | २४,१३४ | १९२९ | ७४,६२५ | ५,४८१ | १०९,५३८ |
| १९९१ | ३११ | ६२९ | १,००३ | ३०३६ | १०४,०७४ | १,७५६ | १२०,८४९ |
| १९९३ | ३९९ | १२९१ | १००,५८३ | १७७९ | ६८,७८७ तोटा | ६६० | ६३,५९६ तोटा |

आधार : संस्थेचे ताळेबंदावरुन

कोष्टक कृमांक ३.३९ वरुन विविध विभागाकडून मिळालेल्या एकूण नफ्याचे प्रमाण दाखविलेले आहे. संस्थेचा एकूण नफा वाढत चालला आहे. १९८३ च्या आकडेवारीवरुन १९९३ मध्ये अ नफ्यात ३ पटीने वाढ झालेली आहे. १९९३ मध्ये तोटा होण्याचे कारण म्हणजे १९९३ हे साल ९ महिन्याचे एक वर्ष मानले होते.

**थकबाकी :**

१९८५ ते १९९३ पर्यन्त संस्थेची थकबाकी पुढील कोष्टकात दाखविली आहे.

**कोष्टक कृमांक ३.४०**

| वर्षे | थकबाकी [रुपयात] |
|---|---|
| १९८५ | ४२,५९५ |
| १९८७ | ८९,२२८ |
| १९९१ | १,११,११५ |
| १९९३ | ६०,६६० |

आधार : संस्थेची कागदपत्रे

कर्जवाटपाच्या प्रमाणाशी थकबाकीची टक्केवारी काढली असता सर्वसाधारणपणे ८० टक्के इतकी रक्कम वसूल होते. व १० टक्के रक्कम थकबाकीत रहाते. कर्जाची वसूली करीत असताना पीकाच्या बिलापोटी रक्कम गोळा केली जाते.

**खेळते भाग भांडवल :**

एका वर्षाच्या कालावधीमध्ये विविध विभागाकडून एकत्रित रक्कम केली असता संस्थेच्या खेळत्या भांडवलाची कल्पना येऊ शकते.

**१९८३ ते १९९३ मधील खेळते भांडवल वाढीचे कोष्टक**

**कोष्टक कृमांक ३.४१**

| वर्षे | खेळते भांडवल [लाखात] |
|---|---|
| १९८३ | १६,९७,४११ |
| १९८६ | २३,३७,७१९ |
| १९८९ | २५,००,५३९ |
| १९९२ | १,५६,१५,७३९ |
| १९९३ | २,१२,६४,५४४ |

आधार : संस्थेची कागदपत्रे

कोष्टक कृमांक ३.४१ वरुन १९८३ मध्ये संस्थेचे खेळते भांडवल फक्त १६९४११ लाख रुपये इतके होते. त्यामध्ये १२ पटीने वाढ होवून २१२६४५४४ कोटी रुपयांचे खेळते भांडवल निर्माण झाले आहे. वरील कोष्टकावरुन संस्थेच्या विकासाचे अवलोकन करता येईल.

१९१६ ते १९९३ पर्यन्त संस्थेच्या विकासाचे व कार्याचे अवलोकन वार्षिक ताळेबंद व अहवालावरुन करण्यात आलेले आहे.

## ३.२५ १९९४ मधील संस्थेचे संचालक मंडळ :

नांद्रे विविध कार्यकारी सहकारी संस्थेची स्थापना सन १९१६ साली झाली. गेल्या ७५ वर्षांच्या कालावधी मधील अभ्यास पहाणी नंतर संस्थेच्या विकासासाठी, प्रगतीसाठी अनेक संचालक मंडळांनी कार्य केलेले आहे. परंतू इतर संचालक मंडळापेक्षा या संचालक मंडळाचे कार्य निश्चितच उत्तम आहे. तसेच जबाबदारीपूर्ण काम आहे; कारण या संस्थेने विकास पाणी पुरवठा या संस्थेला दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा केला आहे. या पाणीपुरवठा संस्थेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने १२ वर्षांकरिता १,२९,१४,१९५ रुपयांचा कर्जपुरवठा केला आहे.

संस्थेचे चेअरमन व संचालक मंडळ पुढील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. चंद्रशेखर सदाशिव शेटे | चेअरमन |
| २. | श्री. शिवाजी बाबूराव चव्हाण | व्हा. चेअरमन |
| ३. | श्री. अशोक नाना चौधरी | संचालक |
| ४. | श्री. अशोक बाबूराव सकळे | -"- |
| ५. | श्री. जयकुमार बाळगोंडा पाचोरे | -"- |
| ६. | श्री. सुभाष बाबगोंडा पाटील | -"- |
| ७. | श्री. धनपाल रामगोंडा पाटील | -"- |
| ८. | श्रीमती कुसुम वसंत बंजाळे | -"- |
| | श्री. अशोक आण्णा चौगुले | सेक्रेटरी |